रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌ आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ MH/MR/RGD/RNP-16/2018-21 (31-12-2022) ॥ वर्ष ८५ ॥ अंक २४५ ॥ पृष्ठे ८ www.krushival.in

## ‘दिगंबरा’च्या जयघोषात दुमदुमली चौलनगरी



पान ३ वर


# कृषीवल

रायगड ॥ शुक्रवार, दिनांक ११ फेब्रुवारी २०२२

किंमत ४ ₹

## ज्येष्ठ अभिनेते अमोल पालेकर यांची प्रकृती खालावली

**पुणे :** ज्येष्ठ अभिनेते अमोल पालेकर यांची प्रकृती खालावल्याने त्यांना पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यांचे वय ७७ वर्ष असून तथापि काळजी करण्याचे काही कारण नाही अशी माहिती त्यांची पत्नी संध्या गोखले यांनी दिली आहे. यापेक्षा अधिक काही सांगण्यास त्यांनी नकार दिला असून अमोल पालेकर यांना एका दीर्घ आजारावरील उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले असल्याचे त्यांनी सांगितले आहे.



# रायगडात महाविकास आघाडीत बिघाडी?

***। माणगाव/ अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।***

***रायगड जिल्ह्यातील महाविकास आघाडीत बिघाडी होण्याची शक्यता आहे. राष्ट्रवादीनंतर आता शिवसेना अधिक आक्रमक झाली आहे. शिवसेना आणि राष्ट्रवादीत टोकाचे मतभेद दिसून येत आहेत. पालकमंत्री बदलण्याची मागणी शिवसेनेकडून करण्यात आली आहे.***

## पालकमंत्री बदलण्याची शिवसेनेची मागणी



रायगड जिल्ह्याच्या राष्ट्रवादीच्या नेत्या आणि पालकमंत्री आदिती तटकरे मनमानी कारभार करत असल्याचा थेट आरोप शिवसेनेने केला आहे. रायगडसाठी शिवसेनेचा पालकमंत्री हवा, अशी मागणी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडे केली आहे. रायगडचे पालकमंत्री बदलासाठी शिवसेनेचे तिन्ही आमदार एकवटले आहेत. महाडचे आमदार भरत गोगावले यांनी पत्रकार परिषदेत घेत राष्ट्रवादीचे पक्षाच्या पालकमंत्री आदिती तटकरे यांना पदावरुन हटविण्याची मागणी केली आहे

> आघाडीचे सरकार आहे. त्यामुळे सर्वसमावेशक कारभार व्हायला हवा अशी अपेक्षा होती परंतु ती फोल ठरली. शिवसैनिकांची कामे होत नाहीत. आमदारांसह शिवसेनेचे पदाधिकारी देखील पालकमंत्र्यांच्या काराभारावर नाराज आहेत.त्यामुळे ही नाराजी वर्षावर पोहोचवली जाईल.
>
> – भरत गोगावले, आमदार

दरम्यान, रायगड जिल्ह्यातील नगरपंचायत निवडणुकीत शिवसेनेने भाजपची मदत घेतली आहे. आता भविष्यात होणाऱ्या सर्वच निवडणुकीत याचा वचपा काढा, असे जाहीर आदेश खासदार सुनील तटकरे यांनी राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांना दिले होते. त्याचवेळी शिवसेनेवर टीका केली. त्यामुळे आघाडीत बिघाडी होण्याची शक्यता व्यक्त होत होती. त्यानंतर शिवसेनेने आक्रमक भूमिका घेतली आहे. राष्ट्रवादीचे पालकमंत्री बदलण्याची मागणी केली आहे. त्यामुळे आघाडीत बिघाडीची शक्यता आहे.

नगरपंचायत निवडणुकीनंतर महाडचे आमदार भरत गोगावले यांनी पत्रकार परीषद घेतली. राष्ट्रवादीच्या आदिती तटकरे या मनमानी कारभार करत आहेत. सहकारी म्हणून कुठलयाही कामात विश्वासात घेत नाहीत, असा आरोप गोगावले यांनी केला. यांना पालकमंत्री पदावरून हटवावे आणि शिवसेनेचा कुणीही पालकमंत्री द्यावा अशी मागणी केली आहे. याबाबत आम्ही तीनही आमदार मुख्यमंत्री उदधव ठाकरे यांची भेट घेणार असल्याचे गोगावले यांनी सांगितले. अलिबागचे आमदार महेंद्र दळवी आणि कर्जतचे आमदार महेंद्र थोरवे हे देखील आपल्या सोबत असल्याचा दावा गोगावले यांनी केला.

आमदार भरत गोगावले यांनी पालकमंत्री आदिती तटकरे यांच्यावर तोफ डागली. सर्व काही पालकमंत्रयांनाच •› पान २ वर

## महत्त्वाचे

### लतादीदींच्या अस्थिंचे विसर्जन

**नाशिक :** भारतरत्न लता मंगेशकर यांच्या अस्थींचे विसर्जन गुरुवारी सकाळी नाशिक येथे करण्यात आले. लता मंगेशकर यांचे लहान भाऊ हृदयनाथ मंगेशकर यांचे पुत्र आदिनाथ मंगेशकर, उषा मंगेशकर आणि इतर कुटुंबियांनी शास्त्रोक्त पद्धतीने विधीवत कलश पूजन केले. त्यानंतर अस्थींचे विसर्जन रामकुंडात करण्यात आलं. त्यांच्या अस्थी घेऊन मंगेशकर कुटुंबिय सकाळी विशेष विमानाने मुंबईतून ओझरला पोहोचले. त्यानंतर ते सकाळी दहाच्या सुमारास नाशिकमध्ये आले होते.

### हिंगणघाट हत्याकांड आरोपीला जन्मठेप

**हिंगणघाट :** दोन वर्षांपूर्वी हिंगणघाटमध्ये एकतर्फी प्रेमातून तरुण प्राध्यापिकेला जिवंत जाळण्यात आल्याची घटना घडली होती. या प्रकरणाची सुनावणी पूर्ण होऊन आज जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाने आरोपी विकेश नगराळेला जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. ३ फेब्रुवारी २०१९ला त्याला अटक करण्यात आली होती. पण या दोन वर्षांच्या कालावधीची त्याला शिक्षेत सूट मिळणार नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार मरेपर्यंत जन्मठेप असा जन्मठेपेचा अर्थ होत आहे.असे उज्वल निकम यांनी सांगितले.




■ गानसम्राज्ञी लता मंगेशकर आणि पंडित बिरजू महाराज यांना अलिबाग येथे पीएनपी नाट्यगहाच्यावतीने संगीतमय आदरांजली वाहण्यात आली. यावेळी पीएनपी सहकारी सांस्कृतिक कला विकास मंडळाच्या अध्यक्षा चित्रलेखा पाटील, डॉ.मेधा घाटे, जिल्हा बँक संचालक ॲड.परेश देशमुख, वेश्वीचे माजी सरपंच प्रफुल्ल पाटील, लायन्स क्लबचे माजी अध्यक्ष भगवाना मालपाणी, शरद वरसोलकर, चेंढरेचे माजी उपसरपंच यतिन घरत उपस्थित होते. यावेळी भूमी काळबेरे, रेश्मा पाटील, अमोल कापसे आदींनी विविध गीते सादर केली. नृत्य दिग्दर्शक योगेश आग्रावकर, संगीतकार विक्रांत वार्डे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. (सविस्तर वृत्त उद्याच्या अंकात)

### जि.प.पं.स सदस्य संख्या वाढीचा

## अहवाल आयोगाला

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांचे वेध सर्वच राजकीय पक्षांना लागले आहेत.येत्या मे मध्ये या निवडणुका होण्याची शक्यता आहे.

आगामी निवडणुकीसाठी रायगड जिल्हा परिषदेची सदस्यसंख्या सातने वाढून ६६ वर जाणार आहे. तर पंचायत समिती सदस्यांची संख्या १४ ने वाढून १३२ वर पोहोचण्याची शक्यता आहे. यासंदर्भातील प्रारूप आराखडा जिल्हा प्रशासनाने तयार केला असून तो गुरुवारी निवडणूक आयोगाला सादर करण्यात आला आहे.

यापूर्वी सदस्यसंख्या ६२ होती त्यानंतर ती कमी होऊन ५९ झाली. आता पुन्हा ही सदस्यसंख्या सातने वाढण्याची शक्यता आहे. गट आणि गण यांच्या संख्येत वाढ करण्याचा राज्य सरकारने आदेश जारी केला आहे. अध्यादेशानुसार मतदारसंघांची फेररचना करण्यात आली आहे. जिल्हा परिषदेच्या गटांची संख्या ५५ पेक्षा कमी नाही, तर ८५ पेक्षा जास्त नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

## जिल्हाधिकारी कार्यालयाचा विस्तार

### पालकमंत्र्यांच्या हस्ते भूमिपूजन



**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हाधिकारी कार्यालयाच्या विस्तारीकरण कामाचा भूमीपूजन समारंभ पालकमंत्री अदिती तटकरे यांच्या हस्ते गुरुवारी ( १० फेब्रुवारी) •› पान २ वर

### पाली, तळा, पोलादपूर, खालापूरमध्ये

## महिला नगराध्यक्षा विराजमान

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील सहा नगरपंचायतींच्या नगराध्यक्ष, उपनगराध्यक्षपदाच्या निवडणुका पार पडल्या. पाली, तळा, पोलादपूर, खालापूरमध्ये महिला नगराध्यक्षा विराजमान झाल्या आहेत.

पाली, तळा, पोलादपूर, खालापूर, माणगाव आणि म्हसळा नगरपंचातींच्या सार्वत्रिक निवडणुका दोन टप्प्यात गेल्या महिन्यात घेण्यात आल्या होत्या. या सर्व नगरपंचायतींच्या नगराध्यक्ष, उपनगराध्यपदाची निवडणूक गुरुवारी (१० फेब्रुवारी) घेण्यात आली.

पाली नगरपंचायतीच्या नगराध्यक्षपदी राष्ट्रवादीच्या गीता पालरेचा तर उपनगराध्यक्ष पदी शेकापचे आरिफ मणियार यांची बिनविरोध निवड झाली आहे.

माणगावमध्ये विकास आघाडीचे शिवसेनेचे ज्ञानदेव पवार तर उपनगराध्यक्षपदी सचिन बोंबले विराजमान झालेले आहेत. तळा नगरपंचायतीमध्ये राष्ट्रवादीची सत्ता आली आहे.त्यामुळे तेथे अस्मिता भोरावकर, नगराध्यक्ष चंद्रकांत रोडे उपनगराध्यक्षपदी बिनविरोध विजयी झालेले हेत.म्हसळ्यातही राष्ट्रवादीचे वर्चस्व असून, तेथे असहल कादिरी नगराध्यक्ष तर सुनिल शेडगे उपनगराध्यक्ष म्हणून निवडूण आलेले आहेत. खालापूरमध्ये शिवसेनेच्या रोशन मोडवे नगराध्यक्षपदी तर राष्ट्रवादीचे राजेश पार्टे उपनगराध्यक्षपदी निवडूण आलेले आहेत. पोलादपूर नगराध्यक्षपदी शिवसेनेच्या सोनल गायकवाड तर उपनगराध्यक्षपदी नागेश पवार यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

(सविस्तर वृत्त पान ३ वर)

## १४ लाखांचा विदेशी मद्यसाठा जप्त

**। पनवेल । वार्ताहर ।**

राज्य उत्पादन शुल्क विभागाने धडक कारवाई करीत चौदा लाखांचा मद्य आणि वाहने जप्त केली आहेत. तुर्भे परिसरात ही कारवाई करण्यात आली. या प्रकरणी सुनिल शांतीभाई वाघेला, डॉ. झाकीर हुस्सेन, उमेश जितेंद्र दुबे, विधी संघर्ष गस्त बालक आदींनी अटक करण्यात आली आहे.



हे सर्वजण हरिश्चंद्र गणा पाटील, रा. तुर्भे याच्या मालकीच्या इको मधून ही विदेशी मद्याची वाहतूक अवैधरित्या वाहतूक करीत होते.राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकाने कोपरखैरणे, तुर्भेगाव आदी ठिकाणी छापा टाकून विदेशी बनावट मद्य जप्त केले.

## नितेश राणे यांचा सरकारला इशारा

**। सावंतवाडी । प्रतिनिधी ।**

मला कोणी अटक करू शकले नाही. माझ्या सिंधुदुर्गातील जनतेला त्रास नको म्हणून मी कुटुंबीय आणि वकिलांशी चर्चा करून स्वतः सरेंडर झालो अशी प्रतिक्रिया आ.नितेश राणे यांनी दिली आहे. जामीन मिळाल्यानंतर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना ते बोलत होते.

## विहूर येथील वादग्रस्त जागेस आयुक्तांचा स्थगिती आदेश

### ३१ मार्चला पुढील सुनावणी

**। मुरुड । वार्ताहर ।**

मुरुड तालुक्यातील विहूर ग्रामपंचायत मधील रौंद परिसरातील गुरचरण जागा जैसे थे ठेवण्याचा आदेश कोकण विभागीय आयुक्तांनी दिला आहे.

येथील काही एकर जागा खाजगी विकासकाने विकत घेऊन तिथे आपले काम सुरू केले होते.याला विहूर ग्रामस्थांचा तीव्र विरोध होता.



सदरील जागा ही गुरुचरण असताना जागा ही खाजगी मालकाची कशी असा सवाल ग्रामस्थांनी केला होता.

याबाबत उप विभागीय अधिकारी यांनी या जागेबाबतचा निकाल हा खाजगी विकासक यांच्या बाजूने दिला होता. या निर्णय विरोधात विहूर ग्रामस्थांनी कोकण आयुक्त यांच्याकडे दाद मागितली होती. दोन्ही पक्षाचे बाजू ऐकल्यावर कोकण आयुक्त यांनी पुढील सुनावणी ३१ मार्चपर्यंत ठेवण्यात आली असून तो पर्यंत सदरची जागा जैसे थे तशीच ठेवण्याचे आदेश दिले आहेत. •› पान २ वर

### कर्नाळा बँकेतील

## 38,600 ठेवीदारांचे पैसे मिळणार

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

कर्नाळा नागरी सहकारी बँकेतील ठेविदारांना त्यांचे पैसे मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. ठेवीदार विमा संरक्षण मंडळाने कर्नाळा नागरी सहकारी बँकेच्या बँक ऑफ बडोदा या खात्यामध्ये तब्बल ३७४ कोटी रुपये जमा केल्याची बातमी खात्रीलायक सूत्रांकडून समजते. ठेवीदारांना दिलासा देणाऱ्या या बातमीमुळे पनवेल उरण परिसरात असणाऱ्या ठेवीदारांमध्ये समाधानाचे वातावरण पाहायला मिळाले.



> ॥ सहकार मंत्री बाळासाहेब पाटील यांचे आ.बाळाराम पाटील यांनी मानले आभार

याबाबत माहिती देताना आमदार बाळाराम पाटील म्हणाले की मी सर्व ठेविदारांचे अभिनंदन करतो आणि अभिनंदन करत असतानाच त्यांचे मनापासून आभार मानतो. कर्नाळा नागरी सहकारी बँकेचे •› पान २ वर






# जेएनपीटीतील उपक्रमांचा केंद्रीय मंत्र्यांकडून आढावा

। उरण।वार्ताहर।

केंद्रीय बंदरे, जहाजवाहतूक व जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी गुरुवारी 'पंतप्रधान गति शक्ती राष्ट्रीय योजनेअंतर्गत' विकासास चालना देण्यासाठी देशातील विविध बंदरांद्वारे आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून 'इज ऑफ डुइंग बिझनेस' आणि कार्यक्षमतेमध्ये वाढ करण्यासाठी केल्या जात असलेल्या विविध उपायोजनांचा व्यापक आढावा घेतला. यावेळी केंद्रीय राज्यमंत्री शंतनू ठाकूर, सचिव डॉ संजीव रंजन आणि सर्व प्रमुख बंदरांचे अध्यक्ष उपस्थितीत होते.



आढावा बैठकी दरम्यान, सचिव डॉ. संजीव रंजन यांनी मल्टी-मॉडल कनेक्टिव्हिटीवर बोलताना पंतप्रधान गति शक्ती योजने अंतर्गत स्मार्ट, मेगा व हरित बंदरे, इज ऑफ डुइंग बिझनेस आणि मेरीटाइम इंडिया व्हिजन २०३० अशा विकासाच्या सात स्तंभांवर प्रकाश टाकला.

गती शक्ती योजना पंतप्रधानांच्या 'आत्मनिर्भर भारत' व्हिजनचा एक महत्त्वाचा भाग असून ह्या योजनेचा उद्देश्य अखंड कनेक्टिव्हिटी, आर्थिक विकास आणि नागरिकांसाठी सुशासन सुनिश्चित करणे आहे. या योजनेच्या यशस्वीतेसाठी जेएनपीटी मंत्रालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करून, प्रगत तांत्रिक उपायांसह संपूर्ण पारदर्शकता आणि व्यवसाय सुलभता सुनिश्चित करण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका पार पाड़ेल असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

> जेएनपीटी प्रकल्पांमुळे जागतिक बाजारपेठांमध्ये प्रवेश व मजबूत मल्टी-मॉडल कनेक्टिव्हिटी तयार होण्यास मदत होणार आहे. या उपक्रमांसोबतच, आम्ही करत असलेल्या प्रगत तांत्रिक उपायांमुळे व्यवसाय सुलभता वाढेल व उत्पादनास चालना मिळेल तसेच जागतिक व्यापारासाठी जेएनपीटी हे सर्व दृष्टीने उपयुक्त बंदर बनण्यास मदत मिळेल.
>
> -संजय सेठी,
> जेएनपीटीचे अध्यक्ष

# महिलांसाठी बचतगटांना प्रशिक्षण द्या

॥ जि.प. उपाध्यक्ष घारे यांचे निर्देश

। कर्जत। प्रतिनिधी।

ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात महिला बचत गट आहेत. त्यांचे कामही चांगले आहे. मात्र आर्थिक उलाढालीत त्यांना फसविण्याचे प्रकार होत आहेत. ते रोखण्यासाठी आणि त्यांच्या उत्कर्षासाठी या महिला बचत गटातील सर्व सदस्यांना प्रशिक्षण देण्याची गरज आहे. ग्रामपंचायतींमधील सेस फंड वापरला जात नाही. त्याचा निधी तसाच पडून आहे. त्यासाठी ग्रामपंचायतींच्या बैठका बोलवून त्यांना त्याबाबत माहिती देणे गरजेचे आहे. तरीही निधी वापरला गेला नाही तर तो महिला बचत गटांना कसा देता येईल? याबाबत विचार करणे गरजेचे आहे, असे रायगड जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष सुधाकर घारे यांनी सूचित केले.



जिल्हा परिषद महिला व बाल कल्याण विभाग सेस फंड २०१९ ते २०२२ मधून महिला बचत गटांना साहित्य वाटप समारंभाचे आयोजन पंचायत समितीच्या सभागृहात करण्यात आले होते. सुधाकर घारे यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. सभापती सुषमा ठाकरे, उपसभापती जयवंती हिंदोळा, रेखा दिसले, सहारा कोळंबे, प्रदीप ठाकरे, सुजाता मनवे, पंचायत समिती सदस्य रवींद्र देशमुख, बळीराम देशमुख, अतिरिक्त गट विकास अधिकारी सी. एस. रजपूत आदी उपस्थित होते.

गट विकास अधिकारी चंद्रकांत साबळे यांनी स्वागत केले. एकात्मिक बाल विकास प्रकल्प अधिकारी अनिकेत पालकर यांनी प्रास्ताविकात कार्यक्रमाचा उद्देश कथन केला. राष्ट्रवादी काँग्रेस महिला तालुकाध्यक्ष ॲड. रंजना धुळे यांनीही मार्गदर्शन केले. त्यानंतर प्रकल्प एक मधील ४७ तर प्रकल्प दोन मधील ४२ महिला बचत गटांना साहित्याचे वाटप करण्यात आले. यामध्ये पापड मशीन, दळण मशीन, मत्स्यकीट, भजनाचे साहित्य यांचा समावेश होता. सूत्रसंचालन अनिता ढमढेरे यांनी केले.


नमुना क्र. ७५

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
रायगड विभाग रायगड
जा.क्र.१९७/२०२२/न्यायशाखा
सहाय्यक धर्मादाय आयुक्त
रायगड विभाग अलिबाग यांचे कार्यालय
कल्पतरु इमारत, पोस्ट ऑफीसजवळ
अलिबाग, जि. रायगड
दि. १०-०२-२०२२

**चौकशीची जाहीर नोटीस**

न्यास नोंदणी अर्ज क्रमांक :- ०२-२०२२
सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक : बलेसिंग्स् वेल्फेअर ट्रस्ट, दहिवली, जि. रायगड, ता. कर्जत

.... बाबत

श्री. अमोल गणपत तांबे --- अर्जदार

सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, मा. सहायक धर्मादाय आयुक्त, रायगड विभाग रायगड हे वर नमूद केलेल्या नोंदणी अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्द्यांवर चौकशी करणार आहेत :-

(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?
(अ) जंगम मिळकत :- (वर्णन) रोख रक्कम-२०००/- रुपये श्री.पी.अे. वेदना रायणन (खजिनदार)यांचे ताब्यात राहील.
(ब) स्थावर मिळकत :- (वर्णन) काही नाही

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यातारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रीतीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकाल बाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा. सहायक धर्मादाय आयुक्त रायगड विभाग रायगड यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक १०-०२-२०२२ रोजी दिली.

सही/-
शिक्का
**(श्रीम. अंजली रमेश पिसाळ)**
**अधीक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**रायगड विभाग, रायगड**



**जाहीर सुचना**

सर्व संबधितांना याद्वारे कळविण्यात येते की, मौजे भादाणे, ता. अलिबाग, जि. रायगड, येथील खाली नमुद वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीपैकी ०-५६-८० (हे.आर.)शेतजमिन मिळकत, श्री. ज्ञानेश्वर मल्लीकार्जुन सगर, यांच्या मालकीची असून, सदरील शेतजमिन मिळकतीपैकी पुर्वेकडील ०-२५-०० आर्स शेतजमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझे अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाचा करार सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान स्वाक्षरीत झाला आहे. सदर जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीत अन्य कोणाचेही कसल्याही तऱ्हेचे हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून चौदा (१४) दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | हि.नं. | क्षेत्र ( हे. आर ) | आकार (रु.पैसे) |
| --- | --- | --- | --- | --- |
| भादाणे, ता. अलिबाग | १०३ | ० | ०-६४-२०<br>०-०९-६० पो.ख.<br>०-७३-८० एकूण | १०-९४ |

वर वर्णन केलेल्या ०-५६-८० (हे.आर.) श्री. ज्ञानेश्वर मल्लीकार्जुन सगर यांच्या मालकीच्या शेतजमिन मिळकतीपैकी ०-२५-०० आर्स शेतजमिन मिळकत.

अलिबाग,
दिनांक : १०/०२/२०२२

सही/
( ॲड. संजय म. भगत )
हिराबाग सोसायटी,
अे विंग, टिळक रोड,
अलिबाग-रायगड.
खरेदीदाराचे वकील



सिडको
शहरांचे शिल्पकार

# जाहीर सूचना

**(वाटपपत्र/करारनामा करणेबाबत)**

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे **करारनामा / वाटपपत्र** प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | गाव व संचिका क्र. | निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता | करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | करारनामा संबंधित भूधारक व त्यांच्या कायदेशीर वारसाची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्य:स्थितीनुसार संपादित जमिनीशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| ता. पनवेल, जि. रायगड | | | | | | | | |
| १ | उलवे २३५ | गव्हाण ३१ | १३७/३<br>१३८/९<br>१६१/६ | ०-३९-९ | ३५० चौ.मी. प्रस्तावित | भूखंड क्र. १७६, सेक्टर-२०, क्षेत्र ३५० चौ.मी. | श्री. वामन बाळकृष्ण घरत | |
| | | | **एकुण** | **०-३९-९** | | | | |
| २ | खारघर २४४ | खारघर ३६८ पै | ६१/२A | ०-१०-८ | १०० चौ.मी. | भूखंड क्र. ६८, सेक्टर-३०, क्षेत्र १०० चौ.मी. | **कै. बुध्या उर्फ बुधाजी सुदाम घरत (मयत) यांचे वारस -**<br>१) श्रीमती इंद्राबाई बुधाजी घरत<br>२) श्री. संतोष बुधाजी घरत<br>३) श्रीमती मंदाबाई एकनाथ केणी<br>४) श्रीमती सुनंदा सत्यवान पाटील<br>५) श्रीमती सुनीता निवृत्ती म्हात्रे | निरंक |
| ३ | तळोजा ४१ | तळोजा ३०१ | १२०/५पै<br>१३७/१अ<br>१३७/१क<br>१४२/६<br>१४७/६अ<br>१४८/१+२+३<br>१८८/२<br>१६२/१<br>१६२/२<br>१६२/३<br>१६४/१ | ०-०६-०<br>०-५८-७<br>०-६५-८<br>०-१७-८<br>०-१२-०<br>०-०६-०<br>०-०८-०<br>०-१३-०<br>०-०९-२<br>०-०५-१<br>०-३०-९ | २२५० चौ.मी. पैकी १६५० चौ.मी. | भूखंड क्र. १६, सेक्टर-२४, क्षेत्र १६५० चौ.मी. | श्री. वसंत गणु केणी | निरंक |
| | | **३६७** | **१४६/३+५** | **०-२४-८** | | | | |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकाच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसाच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकूरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रांसह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करून वाटपपत्र करून देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जांची दखल घेतली जाणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (रायगड)**
सिडको भवन, समस्या निवारण केंद्र, खिडकी क्र.१०, तळ मजला,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (रायगड)**
सिडको/जनसंपर्क/४२२/२०२१-२२


## आज संगीतमय कार्यक्रम

**पनवेल :** जे एम म्हात्रे चारीटेबल ट्रस्टतर्फे तुम मुझे यूँ भुला ना पाओगे या कार्यक्रमाचे आयोजन पनवेल येथील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके येथे ११ फेब्रुवारी रोजी करण्यात आले आहे. स्वर्गीय लता मंगेशकर यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी जे एम म्हात्रे चारीटेबल ट्रस्टचे अध्यक्ष प्रीतम म्हात्रे यांनी तुम मुझे यूँ भुला ना पाओगे कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. ११ फेब्रुवारी रोजी सायंकाळी साडेसहा वाजता हा कार्यक्रम सुरू होणार आहे. या वेळी निवेदक म्हणून आर.जे.गौरव, संगीत संयोजक अजय मदन उपस्थित राहणार आहेत.


**पोलादपूर नगरपंचायत, पोलादपूर**
**शुद्धीपत्रक**

पोलादपूर नगरपंचायत मार्फत दिनांक ०७-०३-२०२२ रोजी पर्यंतच्या कालावधीसाठी विविध कामांकरिता अनुभवी ठेकेदाराकडून विहित नमुन्यात ई-निविदा सादर करण्याकरिता जाहीर सूचना प्रसिद्ध करणेत आली असून सदर जाहिरात प्रसिद्धीमध्ये नजरचुकीने कामाची निविदा पूर्व बैठक ही ११-०२-२०२२ ते १८-०२-२०२२ अशी देण्यात आली आहे. परंतु सदर कामाची निविदा पूर्व बैठक ही २८-०२-२०२२ रोजी दुपारी ३.०० वाजता ठेवण्यात आली आहे. तरी इच्छुक ठेकेदारांनी निविदा पूर्व बैठकी करीता दिनांक २८-०२-२०२२ रोजी दुपारी ३.०० वाजता हजर रहावे.

सही/-
**मुख्याधिकारी**
**नगरपंचायत पोलादपूर**


## विद्यार्थ्यांसाठी कळंबोलीत मार्गदर्शन शिबीर

। खरोशी। वार्ताहर ।

रायगड जिल्हा खाजगी प्राथमिक शाळा कर्मचारी संघटनेच्या १४ फेब्रुवारी या प्रथम वर्धापनदिन सोहळ्याचे औचित्य साधून संघटनेच्या वतीने र्गदर्शन शिबीर आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरात लातूर व नांदेड येथील येथील चिराग सर हे मार्गदर्शन करणार आहेत. हे शिबीर कळंबोली येथील सुधागड सोसायटीचे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात सोमवारी (१४ फेब्रुवारी) पनवेल व कळंबोली परिसरातील शाळांसाठी सकाळी ११ ते १ व रायगड जिल्ह्यातील बाहेर गावातून येणाऱ्या विद्यार्थी, पालक व शिक्षकांसाठी दुपारी १:३० वाजता मार्गदर्शन शिबिर आयोजित केले असल्याची माहिती संदीप कदम, कार्याध्यक्ष साईनाथ गावंड, उपाध्यक्षा मीनाक्षी कर्वे यांनी दिली.


**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसने असे कळविण्यात येते की, आमचे पक्षकारांनी मौजे मुगपे, ता.कर्जत, जि.रायगड येथील खालील प्रमाणे नमूद केलेली जमिन मिळकत तिचे मालक चेतन हरीदत्त लोलेकर यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
| --- | --- | --- | --- |
| ६२ | १४ | ०-३८-०० | २.१२ |
| ६८ | १ | ०-४६-०० | ३.१९ |
| ६८ | ३ | ०-५१-३० | ३.०० |
| ६८ | ४ | ०-५४-८० | ३.८४ |
| ६८ | ६ | ०-१४-०० | ०.५९ |

तरी सदर मिळकतींवर कोणाचाही गहाण, दान, लिज, विक्रीचा करार, पोटगी, चार्ज, बक्षीस, वहिवाट, इजमेंट, बोजा, तारण, वारसा, अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी आपली लेखी हरकत सकृतदर्शनी पुराव्यासह खाली नमूद ॲडव्होकेट यांचेकडे सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा (१४) दिवसांचे आत नोंदवावी. वरील मुदतीत कोणाचीही काहीही हरकत न आल्यास वर वर्णन करण्यात आलेली मिळकत ही निर्वेध, बोजारहित असल्याचे गृहीत धरून आमचे आशिल सदर मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दि.११/०२/२०२२
मो.९८५०८९९२२९

**ॲड.सुवर्णा लक्ष्मीकांत चंदन**
शिव ओम कॉम्प्लेक्स, मुद्रे(बु.)
कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड


## पान १ वरुन

## जिल्हाधिकारी कार्यालयाचा विस्तार

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात संपन्न झाला.

यावेळी जिल्हा परिषद अध्यक्षा योगिता पारधी,कोकण विभागीय आयुक्त विलास पाटील, जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील,पोलीस अधीक्षक अशोक दुधे, अपर जिल्हाधिकारी अमोल यादव, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.पद्मश्री बैनाडे, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ .महेंद्र कुरा, उपजिल्हाधिकारी सर्जेराव म्हस्के-पाटील, सुषमा सातपुते, जिल्हा नियोजन अधिकारी मेहेत्रे, जिल्हा पुरवठा अधिकारी मधुकर बोडके, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुहास माने, कार्यकारी अभियंता जे.ए.सुखदेवे, तहसिलदार विशाल दौंडकर, सचिन शेजाळ, सतिश कदम, सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी गोविंद वाकडे, उपविभागीय अधिकारी प्रशांत ढगे, तहसिलदार मीनल दळवी आणि जिल्हाधिकारी कार्यालयातील इतर अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

## ३८,६०० ठेवीदारांचे पैसे मिळणार

प्रकरण राजकीय आयुध म्हणून वापरण्याचा अनेक लोकांनी प्रयत्न केला. ठेवीदारांना चिथवण्यात आले, मोर्चे काढण्याचा प्रयत्न झाला परंतु या सगळ्या मंडळींना माजी आमदार विवेक पाटील यांना अटक करण्यामध्ये रस होता. ठेवीदारांच्या पैशाशी त्यांना काहीही देणेघेणे नव्हते. आम्ही मात्र ठेवीदारांच्या पाठीशी ठामपणे उभे राहिलो व ठेवीदार विमा संरक्षणाचे पैसे त्यांना मिळावे यासाठी कायम प्रयत्नशील राहिलो. त्या प्रयत्नांना यश मिळत असल्याचे पाहून समाधान लाभते. १३ ऑगस्ट रोजी बँक अवसायानात जाहीर होण्याची प्रक्रिया पूर्ण झाली होती, त्यानंतर अवघ्या सहा महिन्यांमध्ये ठेवीदार विमा संरक्षण अंतर्गत बँकेतील ३८,६०० ठेवीदारांचे पैसे मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

या ठेवीदारांपैकी जवळपास ९० टक्के ठेवीदार हे शेतकरी कामगार पक्षाचे कार्यकर्ते आहेत. त्यामुळे चिथावणीखोर राजकारण करून शेतकरी कामगार पक्षाचे कार्यकर्ते पक्षापासून दूर नेण्याचे प्रयत्न अनेक मंडळींनी केले. परंतु त्यांचे मनसुबे पूर्ण करण्यात त्यांना यश आले नाही, कारण आमच्या कार्यकर्त्यांनी आमच्यावर विश्वास ठेऊन संयम दाखवला त्याबद्दल त्यांचे आभार मानतो. पुढच्या आठ दिवसात वाटपाला सुरुवात होणार असून दीड महिन्याच्या कालावधीत सर्व ठेवीदारांचे पैसे मिळणार आहेत, असे बाळाराम पाटील, आमदार म्हणाले.

**सहकार मंत्र्यांचे सहकार्य**

या सगळ्या प्रकरणामध्ये महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री बाळासाहेब पाटील यांनी प्रचंड सहकार्य केले त्यामुळेच हे शक्य झाले आहे. त्यामुळे विमा संरक्षणाचे पैसे बँकेत जमा झाल्याचे समजताच आमदार बाळाराम पाटील यांनी बाळासाहेब पाटील यांना दूरध्वनी करून त्यांचे मनःपूर्वक आभार मानले.

## महाविकास आघाडीत बिघाडी?

कळतं अशा आवेशात त्या असतात. आमच्या मतदार संघातील कामांमध्ये लुडबूड करतात. पाणी योजना असेल किंवा इतर कामे असतील शिवसेनेच्या आमदारांना कुठंही विश्वासात घेतलं जात नाही. आज आमचे तीन आमदार आहेत त्याचे चार किंवा पाच कसे होतील याकडे आम्ही लक्ष केंद्रीत केलंय. पालकमंत्री अशा पदधतीने वागत असतील तर आम्हाला दुसरा पर्याय नसल्याचे गोगावले यांनी स्पष्ट केलं.

यावेळी जिल्हाप्रमुख अनिल नवगणे, राजीव साबळे, माणगावचे नवे नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, प्रमोद घोसाळकर, अरुण चाळके, गजानन अधिकारी उपस्थित होते. नगरपंचायत निवडणकीत सेना-राष्ट्रवादी संघर्ष प्रामुख्याने समोर आला होता. त्यानंतर आता हा संघर्ष वाढण्याची शक्यता आहे

## आयुक्तांचा स्थगिती आदेश

त्यामुळे वीहूर ग्रामस्थांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत.

याबाबत ग्रामस्थांनी सांगितले की कोकण आयुक्त यांचा स्थगिती आदेश प्रती सर्व महसूल वन व पोलीस यंत्रणेस देणार आहेत तो पर्यंत या ठिकाणी कोणतेही काम होऊ देणार नाही असा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे.


# जाहीर निविदा

**ग्रुप. ग्रामपंचायत मुठवली तर्फे तळे**
**ता.माणगाव, जि.रायगड**

दिनांक :- ०८-०२-२०२२

ग्रुप ग्रामपंचायत मुठवली तर्फे तळे, ता.माणगाव, जि.रायगड २०२१/२०२२ अंतर्गत विकास कामांची निविदा खालीलप्रमाणे

| अ.क्र. | कामाचे नाव/साहित्याचे नाव | प्रशासकीय मान्यता अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा फी | इसारा रक्कम | ग्रा.प.कडे निविदा सादर करणेचा दिनांक | निविदा उघडण्याचा दिनांक | कामाची मुदत | योजनेचे नाव |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| १ | उमरोली-दिवाळी येथे हरिश्चंद्र दळवी ते विहीरीकडे जाणारा रस्ता व पायऱ्या बांधणे | ५००००/- | २००/- | ५००/- | १८/०२/२०२२ सकाळी ११.३० वा. | २१/०२/२०२२ सकाळी ११.३० वा. | १ महिना | ग्रामविधी |
| २ | निवी बौद्धवाडी समाज मंदिराला खिडक्या व दरवाजे बसविणे | ६६९७६/- | २००/- | ६७०/- | १८/०२/२०२२ सकाळी ११.३० वा. | २१/०२/२०२२ सकाळी ११.३० वा. | १ महिना | ग्रामनिधी १५% मागास वर्गीय खर्च |

**अटी व शर्ती**

१. प्राप्त निविदा दिनांक २१/०२/२०२२ रोजी सकाळी ठिक ११.३० वा.ग्रुप ग्रामपंचायत मुठवली/तळे येथे मा.सरपंच यांच्या समक्ष उघडणेत येईल.
२. सदर निविदा बाबत अधिक माहिती ग्रामपंचायत मुठवली/तळे येथे कार्यालयीन वेळेत मिळेल.
३. निविदा मंजूर व नामंजूर करण्याचा अधिकार हा सरपंच तथा ग्रामपंचायत मुठवली/तळे यांचा राहील. निविदा नामंजूर झाल्यास कोणताही पत्र व्यवहार केला जाणार नाही.
४. उपलब्ध निधिनुसार देयके आदा करणेत येईल.
५. निविदा सरपंच तथा ग्रामपंचायत मुठवली/तळे, ता.माणगाव,जि.रायगड या पत्त्यावर पाठविण्यात याव्यात. निविदा बंद लिफाफ्यात पाठविण्यात याव्यात.
६. देयकातून शासन निर्णयाप्रमाणे कपाती केल्या जातील.
७. अपूर्ण व उशिरा पोहोचलेल्या निविदाचा विचार ग्रामपंचायत करणार नाही.
८. ठेकेदारांनी वर्क आर्डर दिलेल्या तारखेपासून मुदतीत काम पूर्ण न केल्यास कोणतेही कल्पना न देता ठेका रद्द करण्यात येईल.
९. काम अंतिम रित्या पूर्ण झाल्यावर ६ महिन्यानंतर कामाची स्थिती पाहून कपात केलेली सुरक्षा अनामत परत केली जाईल.
१०. मा.उपविभाग सा.बांधकाम उपविभाग माणगाव तसेच ग्रा.पं.चे मा.सरपंच मुठवली/तळे यांचे मार्गदर्शन व देखरेखखाली सदर काम करणेचे असून काम समाधानकारक नसेल तर त्याच स्थितीत थांबवून कामाचे आदेश रद्द, करणेचा अधिकार ग्रा.प.ने राखून ठेवला आहे.

**सही/**
**ग्रामसेवक**
ग्रुप ग्रामपचांयत मुठवली तर्फे तळे
ता.माणगाव जि.रायगड

**सही/**
**सरपंच**
ग्रुप ग्रामपंचायत मुठवली तर्फे तळे
ता.माणगाव जि.रायगड

## नगराध्यक्षपदी सोनल गायकवाड

। पोलादपूर । वार्ताहर ।

पोलादपूरच्या नगराध्यक्षपदी शिवसेनेच्या सोनल गायकवाड यांची, तर उपनगराध्यक्षपदी नागेश पवार यांची निवड करण्यात आली. नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी काँग्रेसतर्फे आशा गायकवाड उमेदवारी अर्ज दाखल केला होता. परंतु, ऐनवेळी त्यांनी माघार घेतली. पोलादपूर नगरपंचायतीच्या दोन टप्प्यात झालेल्या दुसऱ्या पंचवार्षिक निवडणुकीमध्ये पहिल्या टप्प्याच्या १३ जागापैकी ७ जागा शिवसेनेला आणि ६ जागा काँग्रेसला मिळाल्या, तर दुसऱ्या टप्प्यातील ४ जागांपैकी १ जागा भाजपला आणि ३ जागा शिवसेनेला मिळाल्या होत्या. मात्र, नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीवेळी आरक्षण सर्वसाधारण महिला जाहीर झाल्यानंतर शिवसेनेकडून सोनल गायकवाड यांचा अर्ज दाखल होणार म्हणून नामसाधर्म्यातून आशा गायकवाड यांचा काँग्रेसकडून अर्ज दाखल करण्यात आला होता.

# पालीच्या नगराध्यक्षपदी गीता पालरेचा

## उपनगराध्यक्षपदी शेकापचे आरिफ मणियार बिनविरोध



। पाली/बेणसे । वार्ताहर ।

पाली नगरपंचायतीच्या पहिल्या नगराध्यक्ष होण्याचा मान राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या गीता पालरेचा यांना मिळाला आहे. बुधवार, दि. ९ रोजी शिवसेनेचे सचिन जवके यांनी नगराध्यक्षपदासाठीचा आपला उमेदवारी अर्ज मागे घेतल्यामुळे गीता पालरेचा यांचा एकच अर्ज शिल्लक राहिला. त्यामुळे गीता पालरेचा या बिनविरोध नगराध्यक्ष झाल्या आहेत.

गुरुवारी (दि.१०) रोजी अधिकृत घोषणा होऊन गीता पालरेचा यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले. तर, उपनगराध्यक्षपदी शेकापचे आरिफ मणियार यांची बिनविरोध निवड झाली. यावेळी उपविभागीय अधिकारी डॉ. यशवंत माने, उपजिल्हाधिकारी अरुण उंडे, मुख्य कार्यकारी अधिकारी अंगाई साळुंखे व सर्व नगरसेवक उपस्थित होते.

विशेष सभा संपन्न झाल्यानंतर आघाडीच्या कार्यकर्त्यांनी तहसील कार्यालयाबाहेर घोषणा देत जल्लोष केला. त्यानंतर सर्वजण बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी गेले. नंतर शिवाजी चौकातून छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन करून घोषणा देत फटाक्यांची आतषबाजी करून मिरवणूक काढण्यात आली.

नगराध्यक्षपदी गीता पालरेचा व उपनगराध्यक्षपदी आरिफ मणियार यांची निवड होताच शेकापचे सरचिटणीस आ. आ. जयंत पाटील, खा. सुनील तटकरे, पालकमंत्री आदिती तटकरे, आ. अनिकेत तटकरे, माजी आ. धैर्यशील पाटील, शेकाप नेते जि.प. सदस्य सुरेश खैरे आदींनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी काढण्यात आलेल्या मिरवणूकप्रसंगी आ. अनिकेत तटकरे, माजी आ. धैर्यशील पाटील, शेकाप नेते सुरेश खैरे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जिल्हाध्यक्ष गीता पालरेचा, राष्ट्रवादी तालुका अध्यक्ष रमेश साळुंके, ग.रा. म्हात्रे, माजी सभापती साक्षी दिघे आदींसह शेकाप व राष्ट्रवादी आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# तळा : नगराध्यक्षपदी अस्मिता भोरावकर, तर उपनगराध्यक्षपदी चंद्रकांत रोडे

। तळा । वार्ताहर ।

तळा नगरपंचायतीच्या नगराध्यक्षपदी अस्मिता चंद्रकांत भोरावकर, तर उपनगराध्यक्षपदी चंद्रकांत महादेव रोडे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. तळा नगरपंचायतीच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसपक्षानेएकहातीसत्ताप्रस्थापित करत शिवसेनेला सत्तेतून पायउतार केले. त्यामुळे नगरपंचायतीत राष्ट्रवादी काँग्रेसचाच नगराध्यक्ष व उपनगराध्यक्ष विराजमान होणार, हे निश्चित झाले होते.

नगराध्यक्षपदासाठी चंद्रकांत रोडे यांचे एकमेव नाव आघाडीवर असताना नगराध्यक्षपदाचे आरक्षण हे सर्वसाधारण महिला असे पडल्याने अस्मिता भोरावकर, ग्रीष्मा गणेश बामणे व माधुरी शैलेश घोलप यांच्या नावाची चर्चा सर्वत्र ऐकायला मिळत होती. अखेर खा. सुनील तटकरे यांनी जेष्ठ नेते चंद्रकांत भोरावकर यांच्या पत्नी अस्मिता भोरावकर यांच्या नावाची घोषणा केली. त्यानुसार दि. ४ रोजी अस्मिता भोरावकर यांचा एकच अर्ज दाखल झाल्याने नगराध्यक्षपदी त्यांची बिनविरोध निवड करण्यात आली, तर उपनगराध्यक्षपदी चंद्रकांत रोडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. यावेळी बोलताना नवनिर्वाचित नगराध्यक्ष आणि उपनगराध्यक्ष यांनी तळा शहरातील सर्व जनतेचे आभार मानले तसेच सर्वांना सोबत घेऊन तळा शहराचा विकास करणार असे आश्वासन दिले. याप्रसंगी आ. अनिकेत तटकरे राष्ट्रवादी काँग्रेसचे नवनिर्वाचित सर्व नगरसेवक, नगरसेविका, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



# म्हसळा : असहल कादिरी नगराध्यक्ष, सुनील शेडगे उपनगराध्यक्ष



। म्हसळा । वार्ताहर ।

म्हसळा नगरपंचायतीच्या नगराध्यक्ष आणि उपनगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे असहल असलम कादिरी यांची नगराध्यक्ष, तर सुनील शेडगे यांची उपनगराध्यक्ष म्हणून निवड झाल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी अमित शेडगे यांनी जाहीर केले.

आ. अनिकेत तटकरे यांनी नगराध्यक्ष व उपनगराध्यक्ष यांचे अभिनंदन केले. याप्रसंगी मुख्याधिकारी मनोज उकिरडे, राष्ट्रवादीचे अली कौचाली, नाजीम हसवारे, जयश्री कापरे, संजय कर्णिक, सभापती छाया म्हात्रे, जि.प.चे. कृषी सभापती बबन मनवे आदी मान्यवर उपस्थित होते. निवडणुकीदरम्यान पोलीस निरीक्षक उद्धव सुर्वे यांनी चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता.

# माणगाव : नगराध्यक्षपदी ज्ञानदेव पवार, तर उपनगराध्यक्षपदी सचिन बोंबले

। माणगाव । वार्ताहर ।

संपूर्ण रायगड जिल्ह्याचे लक्ष लागून राहिलेल्या माणगाव नगरपंचायतीच्या निवडणुकीत माणगाव विकास आघाडीने सत्ता प्रस्थापित केल्यानंतर नगराध्यक्ष व उपनगराध्यक्षपदासाठी गुरुवार, दि.१० फेब्रुवारी रोजी झालेल्या निवडणुकीत नगराध्यक्षपदी माणगाव विकास आघाडीचे ज्ञानदेव पवार, तर उपनगराध्यक्षपदी सचिन बोंबले हे विराजमान झाले.



या निवडणुकीत एकूण १७ जागांपैकी ९ जागांवर माणगाव विकास आघाडीचे नगरसेवक, तर ८ जागांवर राष्ट्रवादी-शेकाप आघाडीचे नगरसेवक निवडून आले. त्यानंतर नगराध्यक्षपदासाठी माणगाव विकास आघाडीतर्फे शिवसेनेचे ज्ञानदेव पवार व राष्ट्रवादी काँग्रेस-शेकाप आघाडीतर्फे आनंद यादव व रिया उभारे निवडणूक रिंगणात होते. तर, उपनगराध्यक्ष पदासाठी माणगाव विकास आघाडीतर्फे सचिन बोंबले, तर राष्ट्रवादी काँग्रेस-शेकाप आघाडीतर्फे शेकापच्या ममता थोरे या निवडणूक रिंगणात होत्या. नगराध्यक्ष व उपनगराध्यक्षपदासाठी बोट वर करून उघड मतदान घेण्यात आले.

या निवडणुकीत पीठासन अधिकारी म्हणून भूसंपादन काळ प्रकल्प माणगाव उपजिल्हाधिकारी नितीन राऊत व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून माणगाव मुख्याधिकारी राहुल इंगळे यांनी काम पाहिले. यावेळी मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

# खालापूरची निवडणूक बिनविरोध



### नगराध्यक्षपदी रोशना मोडवे, उपनगराध्यक्षपदी राजेश पारठे

। खोपोली । प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्यातील खालापूर नगरपंचायतीची निवडणूक नुकतीच झाली होती. त्या अनुषंगाने खालापूर नगरपंचायत नगराध्यक्ष व उपनगराध्यक्षपदाची निवड गुरुवारी बिनविरोध पार पडली. यामध्ये नगराध्यक्षपदी शिवसेनेच्या रोशना मोडवे, उपनगराध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राजेश पारठे यांचीदेखील बिनविरोध निवड करण्यात आली.

याप्रसंगी कर्जत खालापूर मतदारसंघाचे आ. महेंद्र थोरवे यांनी उपस्थित राहून नवनिर्वाचित नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, नगरसेवक यांना शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी मोठ्या संख्येने पदाधिकारी, नागरिक ग्रामस्थ उपस्थित होते.

## महत्त्वाचे

### २.१० कोटींची एमडी पावडर जप्त

**पनवेल :** एमडी (मेथ्यॉक्युलॉन पावडर) नामक अंमली पदार्थ विकण्यासाठी खारघर येथील लिटील वर्ल्ड मॉलजवळ आलेल्या समद नसीबखान शेख (२६) आणि प्रशांत दत्तात्रय वराट (२३) या दोघांना नवी मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेने अटक केली आहे. तसेच त्यांच्याकडून तब्बल २ कोटी १० लाख रुपयांचे २ किलो १०० ग्रॅम वजनाचे एमडी पदार्थ जप्त केले आहे. या दोघांनी सदरचे अंमली पदार्थ कुठून आणले आणि ते कुणाला विक्री करणार होते? याबाबत पोलिसांकडून अधिक चौकशी करण्यात येत आहे. समद शेख आणि प्रशांत वराट अशी आरोपींची नावे आहेत.

### दहा लाखांची रक्कम लुटून पलायन

**पनवेल :** रिक्षामधून आलेल्या दोघा लुटारुंनी एका व्यावसायिकाच्या हातातील दहा लाख रुपयांची रोख रक्कम असलेली पिशवी खेचून पलायन केल्याची घटना सीबीडी सेक्टर-३ परिसरात नुकतीच घडली आहे. सीबीडी पोलिसांनी या घटनेतील दोघा लुटारुंविरोधात चोरीचा गुन्हा दाखल केला असून, त्यांचा शोध सुरु केला आहे. या घटनेतील तक्रारदार बजरंग म्हात्रे हा व्यावसायिक पनवेलमधील वलप येथील रहिवासी असून, त्याचा जुन्या गाड्या खरेदी-विक्रीचा व्यवसाय आहे.

# ‘सावित्री’च्या गाळाने रस्ते निसरडे





- अपघातात अनेक बाईकस्वार जखमी
- उपाययोजना करा; मनसेची मागणी

। महाड । प्रतिनिधी ।

२२ व २३ जुलै २०२१ रोजी महाडमध्ये आलेल्या जलप्रलयावर आता ठोस उपाययोजना राबविण्यास प्रत्यक्ष सुरुवात झाली असून, सध्या सावित्री नदीतील गाळ उपसण्याचे काम युद्धपातळीवर केले जात आहे; परंतु यामुळे रस्ता निसरडा झाल्याने अपघाताचे प्रमाण वाढले आहे.

दरम्यान, शहरातील शेडाव नाका येथील सावित्री नदीतून डंपरमधून उचलून नेत असलेल्या गाळामुळे रस्ता निसरडा होत अनेक मोटार सायकलस्वार गंभीर जखमी होत आहेत. हा प्रकार लक्षात घेता मनसे उपजिल्हाप्रमुख चेतन उतेकर यांनी घटनास्थळी धाव घेत प्रशासनाला उपाययोजना करण्याचे सांगितले आहे.

सध्या सावित्री नदीतील गाळ आणि जुट्टे काढून नदी पात्राची खोली वाढविण्याचे काम राज्य शासनाच्या वतीने सुरु करण्यात आले आहे. सावित्री नदीतील उपसलेला गाळ सध्या नवेनगर म्हाडा येथील मोकळ्या जागेत, तर शहरातील शासनाच्या मालकीच्या जागेत टाकला जाणार आहे. महाड शहराची भौगोलिक रचना पाहता शहरात तसेच महामार्गालगत खासगी मोकळ्या जमिनी आहेत, त्या जागेतसुद्धा हा गाळ भराव म्हणून टाकण्यात यावा, असे जमीन मालक सांगत पुढे येत आहेत, ही समाधानाची बाब म्हणावी लागेल.

# श्रीवर्धनमध्ये विद्यार्थी संख्या घटली

## पाच शाळा बंद, रोजगारासाठी गावाकडील शिक्षणाकडे पाठ

। दिघी । वार्ताहर ।

श्रीवर्धन तालुक्यातील अनेक कुटुंबं प्रतिवर्षी उदरनिर्वाहाच्या शोधात शहरी भागाकडे वळत आहेत. अशा स्थलांतरामुळे अनेक घरे बंद होऊन जिल्हा परिषदेच्या शाळांची पटसंख्या कमी होत आहे. परिणामी, येथील शाळा बंद पडत आहेत. याशिवाय कमी शिक्षक, गुणवत्तापूर्ण व स्पर्धात्मक युगात शिक्षणाचा अभाव व इंग्रजी माध्यमातील शिक्षणाचा प्रभाव ही कारणेदेखील जिल्हा परिषदेच्या शाळांतील कमी विद्यार्थी संख्येला कारणीभूत ठरत आहेत.

सुरुवातीला शिक्षणावर विशेष भर देण्यात आला. या अंतर्गत गाव तिथे जिल्हा परिषदेच्या शाळा उघडण्यात आल्या. मात्र, आता ग्रामीण भागातील चित्र बदललं आहे. रोजगारासोबत शिक्षण सुविधा मिळावी या आशेने अनेक कुटुंबे शहराकडे गेल्याने शाळांमध्ये दिवसेंदिवस पटसंख्या कमी होत चालली आहे. विशेष म्हणजे, आवश्यक सेवा असलेल्या श्रीवर्धन शहर, बोर्लीपंचतन, भरडखोल, दिघी, कुडगाव अशा काही प्रमुख शाळांवर विशेष प्रभाव झालेला दिसून येत नाही. मात्र, दुर्गम भागातील अनेक शाळेच्या पटसंख्येवर विपरित परिणाम झालेला दिसून येत आहे.

### पाच शाळा झाल्या बंद

श्रीवर्धन तालुक्यातील बाग गडब, केळेचीवाडी, धनगरमलई, खारशेत भावे, कोंढेपंचतन या शाळा बंद झाल्या आहेत.



### शाळांची दुरवस्था

बागमांडला उर्दू, सर्वे उर्दू, काळींजे मराठी, सायगाव मराठी, मणेरी, वडवली मराठी, खारशेत भावे उर्दू या शाळांची दुरुस्ती सुरू असून कारविणे कोंढ, मोहितेवाडी, जावेळ व वडघर कोंढ या शाळा निधी अभावी दुरुस्तीच्या प्रतीक्षेत आहेत.

### या ११ शाळांमध्ये पाचपेक्षा कमी विद्यार्थी

करलास, हरवीत उर्दू, वेळास आगार, भावे उर्दू, मोहितेवाडी, कोलमांडला उर्दू, राणवली उर्दू, कार्ले मराठी, निगडी उर्दू, वावेपंचतन, दळवीवाडी या शाळांची स्थिती भविष्यात पटसंख्येमुळे चिंताजनक आहे.

### शाळानुसार रिक्त पदे

तालुक्यातील १०४ पैकी ५ शाळा बंद झाल्या आहेत. उर्वरित ९९ शाळांसाठी २८९ मंजूर शिक्षकांतील ८१ शिक्षक पदे रिक्त असून, १० केंद्रप्रमुखपदासाठी मंजुरी असताना, नऊ पदे रिक्त आहेत.

# मुरुड भात केंद्रातर्फे भाताची विक्रमी खरेदी

। मुरुड जंजिरा । वार्ताहर ।

मुरुड तालुक्यातील आदिती ॲग्रो भात खरेदी केंद्र आंबोली तर्फे ३१ जानेवारीपर्यंत तब्बल १२ हजार क्विंटल विक्रमी भाताची खरेदी झाल्याची माहिती केंद्र संचालक दिनेश मिणमिणे यांनी दिली. उल्लेखनीय बाब म्हणजे, गतवर्षीपेक्षा भात खरेदी केंद्रावर दुप्पट भात शेतकऱ्यांनी विक्री केले आहे.

यावर्षी शेतकऱ्यांना भात विक्रीसाठी ऑनलाईन नोंदणीची मुदत ३१ जानेवारीपर्यंत मिळाली होती. मुरुड तालुक्यासह जिल्ह्यात अवकाळी पाऊस कोसळल्याने भात काढणी लवकर होऊ शकली नाही. परिणामी, ३१ जानेवारीनंतर ज्या भात उत्पादकांना ऑनलाईन नोंदणी करता आलेली नाही. त्यामुळे अशा शेतकऱ्यांचे भात येत्या रब्बी हंगामातील १ मे ते ३० जून २०२२ मध्ये केंद्र शासनाने भात खरेदी केंद्रावर विक्रीसाठी संधी द्यावी, अशी मागणी वाणदे येथील शेतकरी धर्मा सांताबकर यांनी केली आहे.

**दर प्रतिक्विंटल १९४८ रुपये, तर ८०० रुपये बोनस**

तसेच उंडरगाव येथील महादेव नागोजी भोईर व मधुकर विठोबा गुंड यांनी भाताचे चुकारे शासनाने लवकरात लवकर द्यावेत अशी विनंती केली आहे. शासनातर्फे भात खरेदी सुरु केल्यापासून खासगी व्यापारी वर्गाकडून होणारी पिळवणूक टळली आहे. प्रतिक्विंटल रु. १९४८ रुपये इतका भाव देण्यात येत असून, प्रतिक्विंटल रु. ८०० इतका ज्यादा बोनसही शासनातर्फे थेट बँक खात्यात ट्रान्फर करण्यात येत असल्याने दलालांकडून सुटका झाल्याने शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाल्याची भावना शेतकरी वर्गात दिसून येत आहे. यावर्षीचे भाताचे पैसे येत्या दोन दिवसात भात उत्पादक शेतकऱ्यांच्या थेट बँक खात्यात जमा होतील, अशी माहिती रायगड जिल्हा पणन अधिकारी के.बी. ताटे यांनी दिली.

# पत्नीला मारहाण

। पनवेल । वार्ताहर ।

पतीनेच आपल्या पत्नीस जबरी मारहाण केल्याने तिला पनवेल शहरातील पटवर्धन रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले आहे. डेरवली गावात राहणारे गोविंद पाटील (५५) यांनी त्यांच्या पत्नीस शिवीगाळ केली, त्याचा जाब विचारला असता गोविंद पाटील यांनी पत्नीस हाताबुक्क्याने मारहाण केली व तिला उचलून भिंतीवर आपटले. त्यामुळे त्यांच्या उजव्या खांद्याला फॅक्चर झाले आहे. याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात देण्यात आली असून, राधा पाटील यांच्यावर पटवर्धन हॉस्पिटल येथे उपचार सुरू आहेत.

## दत्त महाराजा, कोरोनाचे संकट टळू दे!

# ‘दिगंबरा’च्या जयघोषात दुमदुमली चौलनगरी

## भक्तांनी याचि देही याचि डोळा अनुभवला पालखी सोहळा

*। चौल । प्रतिनिधी ।*

*कोरोनाचे संकट टळू दे, असे साकडे घालत ‘दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा’च्या जयघोषात चौल-भोवाळे येथील पर्वतनिवासी दत्त मंदिरातून दत्तमहाराजांच्या पादुकांवर अभिषेक घालून पालखी परिक्रमणेला गुरुवार, दि. ११ फेब्रुवारी रोजी सकाळी सात वाजता सुरुवात झाली. यावेळी शेकडो भाविकांच्या उपस्थितीत पालखीवर होणारी फुलांची उधळण, ठिकठिकाणी सुवासिनींकडून करण्यात येत असलेले पादुकांचे औक्षण, दर्शनासाठी भाविकांची होत असलेली गर्दी, सोबत टाळ-मृदुंगाचा गजर अन् अव्याहतपणे सुरु असलेल्या भजनाच्या गायनाने चौलनगरी दुमदुमून जाऊन वातावरण भक्तीमय झाले होते.*



*श्री दत्तकृपा अन्नछत्र ट्रस्ट, अलिबागचे अध्यक्ष महेश मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली दत्तमहाराजांच्या पादुकांच्या पायी पालखी परिक्रमेचे आयोजन करण्यात आले होते. यावर्षीचे पालखी परिक्रमेचे हे तिसरे वर्ष होते. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर खबरदारी म्हणून पालखीतील सर्व भक्तांना मास्कचे वाटप करण्यात आले होते. तसेच स्वच्छतेसाठी सॅनिटायझरचाही वापर करण्यात येत होता. ही पालखी चौल भोवाळेमार्गे मुख्य रस्त्यावरुन चौलनाका, चौल भाटगल्ली, सागमळा, चौलमळा येथून पुढे देवघर, सराई, हनुमानपाडा अशी मार्गक्रमणा करीत भोवाळे येथून दत्तमंदिरात सायंकाळी पाचच्या सुमारास प्रस्थान झाली. या पालखी मिरवणुकीने चौल परिसर दुमदुमून गेला होता.*

> पालखी परिक्रमेचे हे सलग तिसरे वर्ष असून, याहीपुढे हा सोहळा दरवर्षी अखंडितपणे सुरु राहणार आहे. यावर्षी कोरोनाचे सावट असतानाही दत्तभक्तांनी दिलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळेच हा सोहळा यशस्वी पार पडला. यापुढेही हा कार्यक्रम असाच भव्यदिव्य करण्याचा प्रयत्न राहील.
>
> – महेश मोरे, अध्यक्ष, अन्नछत्र ट्रस्ट, अलिबाग


# कृषीवलच्या वाचकांना आवाहन

अन्नदान हे श्रेष्ठ दान आहे. आपला वाढदिवस, लग्नाचा वाढदिवस तसेच आपल्या नातेवाईक-मित्रांच्या स्मृतिदीनी आपण समाजातील तळागाळातील लोकांना अन्नदान करावे असे आवाहन कृषीवल आपणाला करीत आहे. अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दुर्गम भागातील राहणारे आदिवासी, मोलमजुरी करणारे, गोर-गरीब रुग्ण विविध उपचारांसाठी येथे येत असतात. ज्यांच्याकडे येण्या-जाण्याचे देखील पुरेसे पैसे नसतात आणि यात घरातला कमवता पुरुष जर आजारी असेल तर या लोकांची मोठी आर्थिक कुचंबणा होत असते. यासाठी या ट्रस्टच्या वतीने जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. जिल्हा रुग्णालयात फक्त रुग्णांसाठी जेवणाची सरकारी सोय असते, त्यांच्या सोबत रुग्णालयात राहणाऱ्या नातेवाईकांना जेवण मिळत नाही. अशा परिस्थितीत रुग्णाच्या नातेवाईकाला फार कठीण परिस्थितीला तोंड देऊन पोटाची खळगी भरावी लागते किंबहुना काही वेळेला उपासमारीचीही वेळ त्यांच्यावर ओढावते. त्यांच्या या अडीअडचणी लक्षात घेऊन श्री कच्छी जैन भवनने असाह्य रुग्णाच्या एका नातेवाईकाला एक वेळचे पूर्ण जेवण देण्यास सुरुवात केली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस







रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)

- मुख्य संपादक, कृषीवल

## आजचे अन्नदाते



**डॉ.सौ. अर्चना व डॉ. श्री. संदेश पाटील, लग्नदिनानिमित्त, अलिबाग.**

## संपादकीय

# प्राण तळमळला

नरेंद्र मोदी हे किती हरफन मौला आहेत हे त्यांना हजारों वेशभूषेत पाहिलेल्या सर्वांना माहिती झालेले आहे. त्यांच्या मंत्रिमंडळातही त्यांच्या व्यतिरिक्त कोणी दिसत नाही इतके ते सगळीकडे असतात. त्यांनी नुकतेच संसदेत केलेले भाषण पाहून अनेकांना त्यांनी पक्षप्रवक्तेपदही स्वत:कडे घेतले की काय, असे वाटल्यावाचून राहिले नाही. त्यांचा अजेंडा म्हणजे काहीही करून निवडणुकीशी संबंधित राज्यांत राजकीय कलह घडवून आणणे आणि ज्या ठिकाणी सत्तेची द्राक्षे आंबट ठरली त्या आंबटपणामुळे होणारी हृदयाची जळजळ त्या राज्यातील सरकारला कोणत्याही प्रकारे बदनाम करीत व्यक्त करणे. त्यासाठी त्यांना वास्तव, सत्य आदी गोष्टींची काहीही गरज नसते. ते अरेबियन नाईट्च्या लेखकालाही लाजवेल अशा सुरस आणि चमत्कारीक कथा लीलया आपल्या विलक्षण कल्पनाशक्तीने जुळवू शकतात. केवळ कथाच नव्हे तर ते अनेक वैज्ञानिक शोधही जन्माला घालू शकतात आणि गणिती प्रमेयही सादर करू शकतात. त्यांनी गटारातून निघणाऱ्या गॅसने चहा बनवलेला आहे आणि स्टेशनवर चहा विकत, भीक मागून जगत असताना ते एनसीसी कॅडेटही बनलेले आहेत. त्यामुळे त्यांनी महाराष्ट्राने कोरोना देशभर पसरवला ही सूरस कथा रचली आणि वाद निर्माण करून दिला. कारण उत्तर प्रदेशातील निवडणुका महत्त्वाच्या आणि तेथील योगी सरकारने कोरोना काळात केलेल्या अकार्यक्षम व्यवस्थेमुळे संपूर्ण गंगेकाठी तरंगणारे आणि किनाऱ्यावरच पुरले गेलेले हजारो मृतदेह जगाने पाहिले आहेत. तसेच मृतदेह अंतिम संस्कारांसाठी स्मशानात दोन दोन दिवस रांगेत ठेवलेले आणि त्यासाठी हजारो रुपयांची लूटमार करणारे प्रशासन पाहिले आहे. आता या प्रतिमा तेथे गुरुवारपासून सुरू होत असलेल्या मतदानात छळणार हे स्पष्ट आहे. त्यामुळे त्यावर पडदा टाकण्याचा एकमेव मार्ग म्हणजे त्याची जबाबदारी दुसऱ्यांवर टाकणे. महाराष्ट्र हे उत्तम राज्य आहे त्यासाठी. गुजरात म्हटले तर आपलीच लाज जाणार. तसेच, त्यांनी काही कारण नसताना आपल्या बादरायण संबंध लावण्याच्या सवयीनुसार हृदयनाथ मंगेशकर यांना त्यांनी सावरकरांच्या प्राण तळमळला या गाण्याला चाल लावल्याबद्दल आकाशवाणीवरून नोकरीतून काढून टाकले असे सांगितले आणि ते मूळचे गोव्याचे असा मुद्दामहून उल्लेख केला. गोव्यात सोमवारी मतदान आहे आणि तेथे गेली दहा वर्षे भाजपाचे सरकार असून ताज्या मतदारांच्या कौलानुसार काँग्रेस पूर्ण बहुमताने निवडून येण्याची शक्यता आहे. असो. तर नुकत्याच निधन पावलेल्या भारतरत्न लता मंगेशकर यांचे बंधू असलेल्या हृदयनाथांना काँग्रेस सरकारने पहा कसे वागवले असा संदेश देण्याचा हा प्रकार आहे. त्याबद्दल खुद्द हृदयनाथ मंगेशकर यांनी काही पुराव्यांसह खुलासा केला तर सत्य कळू शकते. सध्या तरी त्याबद्दलची वस्तुस्थिती वेगळीच असल्याचे दिसून येते. याबद्दल मुंबई आकाशवाणी केंद्रावर दीर्घकाळ वरिष्ठ पदावर काम करणारे मराठीतील प्रख्यात साहित्यिक महेश केळुस्कर यांनी फेसबुक पोस्टवरून माहिती दिली आहे. सावरकरांचे गाणे गायले म्हणून हृदयनाथ मंगेशकर यांना नोकरी गमवावी लागली या माहितीबद्दल त्यांनीही आश्चर्य व्यक्त केले आहे. त्यांच्या मते आकाशवाणीत नोकरी मिळवण्यासाठी रीतसर परीक्षा वगैरे देऊन नंतर नेमणूक होते आणि तसेच कोणाला वाटले म्हणून असे सरसकट काढून टाकले जात नाही. त्याचीही दीर्घ प्रक्रिया असते. त्यांच्या मते पंडित हृदयनाथांचे कोणतेही सर्व्हिस रेकॉर्ड आकाशवाणीकडे नाही. करार पद्धतीने लोक आकाशवाणीवर संगीतकार, गायक म्हणून काम करतात. परंतु अशावेळी जर असा प्रकार घडलेला असेल तर ज्या कारणास्तव कलाकारावर बंदी घातली जाते, तीच संगीतरचना आकाशवाणी आपल्या केंद्रावरून प्रसारीत करणार नाही, हे तार्किक आहे. आज पन्नाशीत, साठीत असलेल्या पिढीलाही त्यांना कळायला लागल्यापासून 'सागरा प्राण तळमळला' हे गाणे आकाशवाणीवरुनच ऐकलेले आहे. केळुस्कर म्हणतात त्याप्रमाणे हे गाणे लोकप्रिय करण्याचे काम आकाशवाणीनेच केले आहे. कारण ते हजारो वेळा केंद्रावरून वाजले. या सगळ्या वास्तवाचा मोदी यांना काही फरक पडत नाही. माणसाने किती खोटे बोलावे, याचे निकष त्यांनी कधीच पार केलेले आहेत. शिवाय, घटनात्मक पदावरील व्यक्तीचा निदान संसदेत खोटे बोलताना प्राण तळमळायला हवा. परंतु, तोही संसदेत खोटे बोलण्याचा संकेत त्यांनी धुळीस मिळवला आहे. संसदेत पहिल्यांदा प्रवेश करताना त्यांनी डोके टेकून व्यक्त केलेला भक्तीभाव किती खोटा आणि दिखावू होता, हेही या निमित्ताने देशाला कळले आहे.

# सर्वत्र राजकीय अपरिहार्यता!

प्रा. अशोक ढगे

देशात आता निवडणुकीचं रण खऱ्या अर्थाने तापलं आहे. या रणधुमाळीत उत्तर प्रदेश, पंजाब आणि गोव्यातल्या राजकीय कुरघोड्या जवळून पहायला मिळत आहेत. यातून देशाचं प्रातिनिधीक राजकीय चित्र पहायला मिळत आहे. प्रचार जसजसा पुढे जात आहे, तसतशी राजकीय पक्षांमधली चढाओढ जवळून अनुभवायला मिळणार आहे. आजच्या राजकीय संस्कृतीची ही झलक बरंच काही सांगून जाणारी आहे.

पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांमध्ये एक एक टप्पे एव्हाना पार पडू लागले आहेत. आता रण खऱ्या अर्थाने तापलं आहे. या रणधुमाळीत उत्तर प्रदेश, पंजाब आणि गोव्यातल्या राजकीय साठमारीतल्या राजकीय कुरघोड्या जवळून पहायला मिळत आहेत. यातून देशाचं प्रातिनिधीक राजकीय चित्र पहायला मिळत आहे. प्रचार जसजसा पुढे जात आहे, तसतशी राजकीय पक्षांमधली चढाओढ जवळून अनुभवायला मिळणार आहे. मात्र आजच्या राजकीय संस्कृतीची ही झलक बरंच काही सांगून जाणारी आहे.

अलिकडेच एका व्हर्च्युअल रॅलीमध्ये, काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधी यांनी पंजाबचे मुख्यमंत्री चरणजीत सिंग चन्नी यांना काँग्रेस पक्षाकडून मुख्यमंत्रीपदाचे उमेदवार म्हणून घोषित केलं. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नवज्योत सिद्धू, सुनील जाखर यांच्यासह अन्य अनेकजण मुख्यमंत्रीपदासाठी इच्छुक असताना चन्नी यांनाच मुख्यमंत्रीपदाचा उमेदवार जाहीर करणं ही काँग्रेसची अपरिहार्यता होती. याचं कारण विविध पाहण्यांमधल्या निष्कर्षांमध्ये मुख्यमंत्री म्हणून चरणजीत सिंग चन्नी यांना सर्वाधिक पसंती होती. त्याचबरोबर दलित-शीख मतांचं कार्ड त्यामागे आहे. गेल्या अनेक दिवसांपासून पंजाब काँग्रेसमध्ये मुख्यमंत्रीपदावरून वाद सुरू होता. मात्र, मुख्यमंत्रीपदासाठी मुख्य स्पर्धा चन्नी आणि सिद्धू यांच्यात होती. गेल्या अनेक दिवसांपासून मुख्यमंत्रीपदाचा उमेदवार जाहीर करण्यासाठी काँग्रेसमध्येच दबाव होता. शिवाय अनेक नावं चर्चेत होती. काँग्रेसचा पंजाबमधला जवळचा स्पर्धक असलेल्या आम आदमी पक्षाने खासदार भगवंत मान यांना मुख्यमंत्रीपदाचा उमेदवार जाहीर केलं. या पार्श्वभूमीवर राहुल यांनी सर्व अटकळींना पूर्णविराम देत चन्नी यांना मुख्यमंत्रीपदाचा उमेदवार म्हणून घोषित केलं. राहुल यांनी सिद्धू यांच्यापेक्षा चन्नी यांना पसंती का दिली, याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

प्रदेश काँग्रेसच्या अंतर्गत सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, राहुल यांच्याकडे चन्नी यांच्याशिवाय दुसरा पर्याय नव्हता. राज्यात काँग्रेससाठी चन्नी हे एकमेव पात्र उमेदवार होते. मुख्यमंत्रीपदाचा उमेदवार म्हणून दुसऱ्याला घोषित केलं असतं तर निवडणुकीपूर्वी पक्षासाठी ती आत्महत्या ठरली असती. पक्षाने सिद्धू यांना मुख्यमंत्रीपदाचा उमेदवार म्हणून घोषित केलं असतं तर जनतेची इच्छा डावलली गेली असती, असं काँग्रेसच्या अंतर्गत सूत्रांनी सांगितलं. शिवाय सिद्धू यांना पक्षातल्या काही नेत्यांचा विरोध होता. त्यांचा लहरी स्वभाव हे ही एक कारण होतं. काही महिन्यांपूर्वी चन्नी यांची मुख्यमंत्री म्हणून निवड केली होती; पण लवकरच त्यांनी आपल्या स्वच्छ प्रतिमेद्वारे आणि झटपट घोषणांच्या माध्यमातून सर्वांना मागे टाकलं आणि राज्यात लोकप्रिय झाले. कॅ. अमरिंदर सिंग यांनी पक्ष सोडल्यानंतर राहुल यांच्यासमोर दुसरा पर्याय उरला नव्हता.



सिद्धू यांनीही यापूर्वी पंजाबच्या समस्या सोडवण्याबाबत घोषणा करण्याच्या उद्देशाने प्रामाणिक प्रयत्न केले; पण त्यांचा अहंकार मार्गातला मोठा धोंडा ठरला. काँग्रेसच्या एका नेत्याने सांगितलं की काही महिन्यांपूर्वी मी सिद्धूंसोबत होतो, पण त्यांची वृत्ती स्वत:पुरतं पाहण्याची आहे. ते आमच्याबद्दल कधीच बोलत नाहीत. त्यामुळे सिद्धू यांना मुख्यमंत्रीपदाचा उमेदवार घोषित करणं काँग्रेससाठी नुकसानकारक ठरलं असतं. श्री. चन्नी यांची स्वच्छ प्रतिमा, ही त्यांची भक्कम बाजू आहे. आजपर्यंत कोणीही सिद्धू यांना मुख्यमंत्री करण्याची मागणी केलेली नाही. सर्व ठिकाणांहून चन्नी यांच्याच नावाचा आग्रह होतो. राजकारण आणि निवडणुका सामूहिक प्रयत्नाने होतात; पण सिद्धू स्वप्रतिमेच्या विळख्यात होते.

चन्नी यांची सर्वात जमेची बाजू म्हणजे स्वच्छ प्रतिमा आणि दलित असणं. पंजाबमधली ३२.५ टक्के दलित लोकसंख्येला आकर्षित करण्याची यापेक्षा चांगली संधी काँग्रेसला मिळू शकली नसती. याशिवाय त्यांच्या अनेक योजना लोकांमध्ये लोकप्रिय झाल्या आहेत. 'गरीब घर कार्ड'चं खूप कौतुक होत आहे. काँग्रेसच्या एका नेत्याने सांगितलं की लोकांच्या मनस्थितीनुसार काँग्रेसकडे चन्नी यांना मुख्यमंत्रीपदाचे उमेदवार घोषित करण्याशिवाय पर्याय नव्हता.

एकीकडे राजकीय अपरिहार्यता पहायला मिळत असताना दुसरीकडे उत्तरप्रदेशची सत्ता काबीज करण्याचं स्वप्न पाहणारे समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव अंधश्रद्धा सोडायला तयार नाहीत, असं पहायला मिळालं. अखिलेश अजूनही नोएडाला अशुभ मानतात. अखिलेश यांनी गेल्या ११ वर्षांपासून नोएडाच्या भूमीवर पाऊल ठेवलेलं नाही. २०१२ ते २०१७ या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात ते एकदाही नोएडात आले नाहीत. अलिकडेच निवडणुकीच्या प्रचारादरम्यान त्यांचा ताफा रात्री ११ वाजता ग्रेटर नोएडाच्या लुहाली (दादरी) टोल प्लाझावर पोहोचला; मात्र त्यांनी या भूमीवर पाय ठेवला नाही. ते गाडीतून खाली उतरलेच नाहीत. पाऊस असूनही समाजवादी पक्षाचे कार्यकर्ते टोल प्लाझावर अनेक तास अखिलेश यांची वाट पाहत होते. ११ वर्षांनंतर अखिलेश यांचं आगमन होताच कार्यकर्त्यांनी ढोल-ताशांच्या गजरात स्वागत केलं; मात्र अखिलेश गाडीतून खालीही उतरले नाहीत. समाजवादी पक्षाच्या प्रमुखांनी आपल्या गाडीची खिडकी उघडली, हात हलवला आणि दिल्लीला निघून गेले. अखिलेश खाली येऊन भेटतील, अशी कार्यकर्त्यांची अपेक्षा होती; मात्र तसं झालं नाही.

असं मानलं जातं की जो कोणी नोएडाला भेट देतो, त्याची मुख्यमंत्रीपदाची खुर्ची अडचणीत येते, त्याला मुख्यमंत्रिपद हुलकावणी देतं. १९८० पासून असं पाच वेळा घडलं आहे, जेव्हा उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांनी नोएडाला भेट देऊन आपली जागा गमावली.

अखिलेश यांचाही या मुद्द्यावर विश्वास आहे. त्यामुळेच सरकार गेल्यानंतरही त्यांनी नोएडात पाऊल ठेवलं नाही. एन. डी. तिवारी १९८० मध्ये नोएडाला आले आणि मुख्यमंत्रीपदाची खुर्ची गमावली. त्याचप्रमाणे वीर बहादूर सिंग यांनी त्यांची खुर्ची गमावल्यानंतर काही दिवसांनी १९८८ मध्ये नोएडाला भेट दिली होती. १९९५ मध्ये मुलायम सिंग, १९९७ मध्ये मायावती आणि १९९९ मध्ये कल्याण सिंग यांच्याबाबतही असंच घडलं. २०११ मध्ये मायावती नोएडामध्ये आल्या आणि २०१२ मध्ये सत्तेतून बाहेर पडल्या. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांचा या अंधश्रद्धेवर विश्वास नाही.

आपल्या कार्यकाळात ते २० हून अधिक वेळा नोएडाला गेले. मेट्रोचं उद्घाटन करण्यासाठी मुख्यमंत्री योगी २३ डिसेंबर २०१७ रोजी नोएडा येथे गेले होते. या बैठकीत पहिल्यांदाच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नोएडाच्या निमित्ताने अखिलेश यांना अंधश्रध्दा म्हटलं होतं. २५ डिसेंबर २०१७ रोजी पंतप्रधान मोदी म्हणाले होते की, आज मला आनंद आहे की, नोएडाबद्दल चुकीची प्रतिमा तयार केली गेली आहे. इथे कोणताही मुख्यमंत्री येऊ शकत नाही, हा चुकीचा समज आहे. योगीजींनी आपल्या आचरणाने ती खोटी असल्याचं सिद्ध केलं. आधुनिक युगात असं काही होऊ शकत नाही.

दरम्यान, प्रचारकाळात काही गमतीही पहायला मिळत आहेत. राजस्थानचे माजी उपमुख्यमंत्री सचिन पायलट यांना काँग्रेसने पंजाब, उत्तरप्रदेश, उत्तराखंड आणि गोव्यात स्टार प्रचारक बनवलं आहे. ते ना सरकारमध्ये आहेत, ना संघटनेत. त्यांनी एकदा पक्षाविरुद्ध बंडही केलं आहे. तरी पायलट यांना स्टार प्रचारक का केलं, असा प्रश्न काँग्रेस कार्यकर्त्यांना पडला आहे. यामागे राजकीय आडाखे आहेत. पायलट यांना स्टार प्रचारक बनवण्याकडे काँग्रेस पक्षश्रेष्ठींचा राजकीय संदेश म्हणून पाहिलं जात आहे. पायलट यांनी उत्तर प्रदेशसह अन्य राज्यांमध्ये जाऊन काँग्रेससाठी पूर्ण ताकद पणाला लावली. अशा स्थितीत भविष्यात राजस्थानमध्ये गेहलोत यांची जागा घेणारे ते सर्वात शक्तिशाली नेते असल्याचं स्पष्ट झालं आहे.

या राज्यांच्या स्टार प्रचारकांच्या यादीत अशा अनेक नेत्यांची नावं आहेत; पण त्यांची सक्रियता शून्य आहे. ज्येष्ठ पत्रकार आणि काँग्रेस पक्षाला जवळून ओळखणारे रशीद किडवई म्हणतात की सचिन पायलट हे उत्तम वक्ते आहेत. तरुण आणि महिला मतदारांमध्ये त्यांची वेगळी क्रेझ आहे. त्यांनी आसाम, केरळमध्येही पक्षाचा प्रचार केला होता. मध्यप्रदेश आणि छत्तीसगडमध्ये त्यांच्यासारखा दुसरा नेता नाही. जून २०२१ मध्ये, राजस्थानमध्ये मंत्रिमंडळ विस्ताराच्या वेळी गेहलोत आणि पायलट गट आमनेसामने होते. अशा स्थितीत स्पष्टीकरण देण्यासाठी प्रदेश प्रभारी अजय माकन आले. श्री. पायलट ही एक शक्ती असल्याचं माकन यांनी म्हटलं होतं. त्यामुळे त्यांना तेव्हा सांभाळून घेतलं गेलं आणि आताही स्टार प्रचारक म्हटलं जात आहे.

# शेकापचा दणकाच भारी!

शेतकरी कामगार पक्षाची तळागाळातील सर्वसामान्यांविषयी असलेली तळमळ अलिबाग-रामराज-रोहा या रखडलेल्या रस्त्याच्या कामी पुन्हा एकदा दिसून आली. जर कोणावर अन्याय होत असेल, कोणी संकटात असेल वा कोणतीही मोठी अडचण असू दे, शेकापच्या नेत्यांना फक्त हाक घालायची खोटी, त्याक्षणी कोणताही मागचा-पुढचा विचार न करता अडलेल्याला मदत करणे, हा शेतकरी कामगार पक्षाचा स्थायीभाव आहे. म्हणूनच जनसामान्यांपर्यंत असलेली शेकापची नाळ आजही घट्ट आहे. त्याचा प्रत्यय परवाच आला. अलिबाग-रोहा मुख्य रस्त्याचे काम का रखडले? याचा जाब विचारण्यासाठी शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस आ. जयंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महिला आघाडीप्रमुख चित्रलेखा पाटील यांच्या नेतृत्वात शिष्टमंडळाने अलिबाग येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयात जाऊन अधिकाऱ्यांची चक्क झाडाझडतीच घेतली. शेकाप कार्यकर्ते अनपेक्षितपणे कार्यालयात दाखल झाल्याने उपस्थित असणाऱ्या अधिकाऱ्यांचीही धांदळ उडाल्याचे पाहावयास मिळाले. जबाबदार अधिकारी नेहमीप्रमाणे कार्यालयात हजर नसल्याने चित्रलेखा पाटील यांचा पारा चांगलाच चढला. त्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना फोनवरुन कामाच्या दिरंगाईबाबत विचारणा केली. तसेच रस्त्याच्या कामाकडे होत असलेल्या दुर्लक्षाबाबत नाराजी व्यक्त केली. जर तातडीने रस्ता दुरुस्तीचे काम सुरु झाले नाही, तर आम्हाला शेकाप स्टाईलने ते करुन घ्यावे लागेल, असा सज्जड दमच चित्रलेखाताईंनी यावेळी अधिकाऱ्यांना दिला. अशा प्रकारे रस्त्याच्या कामाबाबत सुरु असलेला भोंगळ कारभार चव्हाट्यावर आणत उपस्थित अधिकाऱ्यांचा पाणउताराच केला. त्यामुळे अधिकाऱ्यांची बोलतीच बंद झाली होती. अशा प्रकारे काम कोणतेही असो, एकदा का शेकापने त्यात लक्ष घातले, वा ते करण्याचे आश्वासन दिले, की त्याचवेळी ते अर्धे पूर्ण झाल्यासारखे असते, हा जो सर्वसामान्यांच्या मनात पक्षाबद्दल विश्वास आहे, तो आज खरा ठरताना दिसत आहे. आज या रस्त्याच्या कामाला सुरुवात झाल्याने सर्व प्रवासी, नागरिक आणि वाहनचालकांकडून शेकापला धन्यवाद देण्यात येत आहेत. सर्वसामान्यांच्या हक्कासाठी रस्त्यावर उतरुन रणरागिणीचा अवतार घेणाऱ्या चित्रलेखाताईंच्या कार्याला लाल सलाम!

वार-वार
राकेश लोहार

# प्रशासनाला साथ द्या!

रायगड जिल्ह्यातील संभाव्य पाणीटंचाईचा सामना करण्यासाठी जिल्हा परिषद प्रशासन सज्ज झाले असून, आतापासून त्यासंबंधित उपाययोजना करण्यावर भर देण्यात येत आहे. पाणी जपून वापरावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. एप्रिल-मे महिना उजाडताच पाणीटंचाईचे संकट आ वासून उभे असते. पाणीटंचाईचा प्रश्न काही नवीन नाही. त्याचे कारण तुम्ही जाणताच... बरोब्बर! पाऊस. सगळं खापर निसर्गावर फोडायचं, हे ठरलेलंच! सरकार, प्रशासन चुकीचे वागतेय, असा ओरडा करायचा, लोकप्रतिनिधी काही कामाचे नाहीत, असे म्हणत त्यांच्या नावानेही बोंबा मारायला आपण मोकळे. त्यातून आपले इति कर्तव्य पूर्ण झाल्याचे समाधान घेऊन स्वत:वरच खुश व्हायचं, करायचं मात्र काही नाही. आपल्यापैकी बहुतांश सगळेच पाऊस कमी झाल्यानं जी पाणीटंचाई निर्माण झाली आहे, त्याबद्दल भरभरून बोलतात. उन्हाळ्यात ही समस्या अधिक गंभीर होते. तेव्हा आतापासूनच प्रत्येकाने दुष्काळाचे गांभीर्य लक्षात घेण्याची गरज आहे. त्यासाठी प्रत्येकाला पुढे येणार असलेल्या जलसंकटाला सामोरे जाण्यासाठी जाणीवपूर्वक काळजी घ्यावी लागणार आहे. मग विचार कसला करता आहात? यानिमित्ताने एकत्रित येऊन प्रयत्न केले, तर पाणीटंचाईवर मात करणे सहज शक्य आहे. त्यामुळे आतापासूनच पाणी वाचविणे गरजेचे आहे. नाहीतर भविष्यात पाण्याचा तुटवडा सगळ्यांसाठी चिंतेचा विषय ठरणार आहे. कोणी कोणी म्हणेल, आम्ही पाणी विकत घेऊ! पण, पाणीच शिल्लक नसेल, तर नुसते पैसे असून उपयोग नाही. आपल्याला हेही लक्षात असायला हवे, की धरणाची जलसंपन्नता असली तरी ती मर्यादित आहे आणि पावसाची स्थिती वर्षागणिक अशीच राहिली, तर येणारा काळ आपल्या कसोटीचा आहे. त्यामुळे आपण पाणी बचतीबाबत व्यापक जनजागृती करून पाणीटंचाईसारख्या कठीण प्रसंगाला एकजुटीने सामोरे जाऊया. त्यासाठी जिल्हा प्रशासनाने केलेल्या पाणीबचतीच्या आवाहनाला सहकार्य करुया. म्हणून भविष्यातील पाणीसंकट आपल्याला निश्चितच टाळता येईल. शिवाय आपले कुटुंबीय, मित्रपरिवार यांच्यापर्यंतही हा 'पाणी वाचवा' संदेश पोहोचवून सामाजिक बांधिलकी जपत माणुसकीचे दर्शन घडवूया!




वैयक्तिक स्वतंत्र जीवाचे प्रतिनिधीत्व अर्जुनाने केले आहे तर परमात्मा स्वतः भगवान श्रीकृष्ण आहेत. चौथ्या अध्यायाच्या प्रारंभी असे दिसून येईल की, ते एकाच स्तरावर नाहीत. जर अर्जुन आणि श्रीकृष्ण एकाच पातळीवर असते आणि श्रीकृष्ण अर्जुनापेक्षा श्रेष्ठ नसते तर त्यांच्यामधील गुरुशिष्य हा संबंध अर्थहीन ठरतो. जर दोघेही मोहित होणारे असते तर त्यांच्यातील एकाने शिष्य आणि दुसऱ्याने गुरु बनण्याची काहीच आवश्यकता नव्हती, असा उपदेश निरुपयोगीच ठरला असता कारण मायेच्या तावडीत कोणीच प्रमाणित गुरु बनू शकत नाही. अशा परिस्थितीत मान्य केले पाहिजे की, श्रीकृष्ण हे भगवान आहेत आणि मायेने मोहित झालेला जीवात्मा अर्जुन याच्यापेक्ष ते श्रेष्ठ आहेत.

मात्रास्पर्शास्तु कौन्तेय शीतोष्णसुखदुःखदाः ।
आगमापायिनोऽनित्यास्तांस्तितिक्षस्व भारत ।।१४।।

मात्रा-स्पर्शाः- इंद्रियाविषयांची जाणीव; तु-केवळ; कौन्तेय- हे कुंतीपूत्रा; शीत-हिवाळा; उष्ण-उन्हाळा; सुख-सुख; दुःख- आणि दुःख, दा-देणारे; आगम-येणे; अपायिनः- अदृश्य होणारी, विनाश पावणारी; अनित्याः- अनित्य; तान्-त्या सर्वांना; तितिक्षस्व-केवळ सहन करण्याचा प्रयत्न कर; भारत- हे भरतवंशजा.

हे कौंतेया! तात्पुरती उत्पन्न होणारी आणि कालांतराने विनाश पावणारी जी सुखदुःखे आहेत ती हिवाळा व उन्हाळा यांच्या येण्याजाण्याप्रमाणे आहेत. हे भरतवंशजा! ती सुखदुःखे इंद्रियांना होणाऱ्या जाणीवेपासून निर्माण होतात आणि मनुष्याने ती क्षुब्ध न होता सहन करण्यास शिकले पाहिजे.

तात्पर्य : योग्य कर्तव्यपालनासाठी एखाद्याने अनित्य असणाऱ्या सुखदुःखांची उत्पत्ती व विनाश सहन करण्यास शिकलेच पाहिजे. वेदाज्ञेप्रमाणे एखाद्याने माघ (जानेवारी-फेब्रुवारी) महिन्यातही भल्या पहाटे स्नान करणे आवश्यक आहे. त्यावेळी अतिशय थंडी असते तरीही जे धार्मिक तत्वांचे पालन करतात ते अशा वेळी स्नान करण्यास मागेपुढे पाहत नाहीत. त्याचप्रमाणे मे-जून महिन्यातील कडक उन्हाळ्यातही स्त्री ही स्वयंपाकघरात स्वयंपाक करण्यास मागेपुढे पाहत नाही. प्रतिकूल हवामानातही मनुष्याने आपले कर्तव्यपालन केलेच पाहिजे. त्याचप्रमाणे युद्ध करणे हे क्षत्रियांचे धार्मिक तत्व आहे आणि जरी एखाद्या क्षत्रियाला आपला मित्र किंवा नातेवाईक यांच्याबरोबर युद्ध करावे लागले तरी त्याने त्याच्या नियतकर्मापासून ढळू नये. ज्ञानस्तरापर्यंत उन्नत होण्यासाठी एखाद्याने नियत विधिविधानांचे पालन करणे आवश्यक आहे. कारण केवळ ज्ञान आणि भक्तीद्वारेच मनुष्य मायेच्या तावडीतून स्वतःला मुक्त करु शकतो.

अर्जुनाला ज्या दोन नावांनी या ठिकाणी संबोधण्यात आले आहे ते सुद्धा महत्वपूर्ण आहे. त्याला कौन्तेय नावाने संबोधण्यामुळे त्याच्या आईच्या बाजूकडील थोर रक्ताच्या नातेवाईकांचा बोध होतो आणि भारत या नावाने संबोधण्यामुळे त्याच्या पित्याकडील असणाऱ्या महानतेचा बोध होतो. दोन्ही बाजूंनी त्याचा वारसा थोर होता. थोर वारशामुळे योग्य कर्तव्यपालनाची जबाबदारी वाढते. म्हणून अर्जुन युद्ध करण्याचे टाळू शकत नाही.

यं हि न व्यथयन्त्येते पुरुषं पुरुषर्षभ ।
समदुःखसुखं धीरं सोऽमृतत्वाय कल्पते ।।१५।।

यम्- ज्याला; हि-निश्चित; न- कधीच नाही; व्यथयन्ति- व्यथित होणे किंवा विचलित होणे; एते-या सर्व; पुरुषम्- पुरुषाला; पुरुष-ऋषभ- हे पुरुषश्रेष्ठा; सम-अविचल किंवा समान; दुःख- दुःखामध्ये; सुखम्- सुखामध्ये; धीरम्- धीर; विवेकी; सः- तो; अमृतत्वाय- मुक्तीसाठी; कल्पते- योग्य होतो.

हे पुरुषश्रेष्ठा अर्जुना! जो मनुष्य सुख आणि दुःख यांनी विचलित होत नाही आणि दोन्ही अवस्थांमध्ये स्थिर असतो तो मोक्षप्राप्तीसाठी निश्चितपणे योग्य आहे.


तात्पर्य : आध्यात्मिक साक्षात्कारामधील उच्चतर अवस्थेची प्राप्ती करण्याच्या निश्चयात जो दृढ आहे आणि सुखदुःखाचे आघात जो समभावाने सहन करतो तो खचितच मोक्षप्राप्तीस पात्र आहे.

(क्रमशः)

(भगवद्गीता स्पर्धा माहिती पान क्रमांक ८ वर)

## लोकसंसद

### वाहतूक कोंडीच्या शहरांमध्ये मुंबईचा पाचवा क्रमांक



जागतिक पातळीवर वाहतूक कोंडीचा अभ्यास करणाऱ्या हॉलंडमधील ॲमस्टरडॅमस्थित टॉम टॉम या कंपनीच्या ट्रॅफिक इंडेक्सनुसार (टॉमटॉम रहदारी निर्देशांक) मुंबई हे जगातील सर्वाधिक वाहतूक कोंडी असलेल्या शहरांमध्ये पाचव्या स्थानावर आहे. जगातील सहा खंडातील ५८ देशांमधील ४०४ शहरांमधील वाहतूक व्यवस्थेचा अभ्यास करून वाहतूक कोंडीचा टॉम टॉम रहदारी निर्देशांक नुकताच जाहीर करण्यात आला आहे. मुंबईत तब्बल ५३ टक्के वाहतूक कोंडी होते म्हणजे अर्ध्या तासाच्या प्रवासाला मुंबईत पाऊण तासापेक्षा जास्त वेळ लागतो. टॉमटॉम ट्रॅफिक इंडेक्सच्या यादीत भारतातील बंगळुरू १० व्या स्थानी, नवी दिल्ली ११ व्या स्थानी तर पुणे २१ व्या क्रमांकावर आहे. तुर्की देशातील इस्तांबुल हे शहर पहिल्या स्थानावर असून दुसऱ्या क्रमांकावर रशियाचे मॉस्को शहर तर तिसऱ्या आणि चौथ्या क्रमांकावर अनुक्रमे युक्रेनमधील किव शहर आणि कोलंबियाची राजधानी बोगोटा हे शहर आहे. वास्तविक वाहतूक कोंडीचा मुंबईचा पाचवा क्रमांक खाली घसरू शकतो व प्रचंड वाहतूक कोंडीमुळे होणारे वायू प्रदूषण, वेळेचा होणारा अपव्यय व वाया जाणाऱ्या कोट्यावधी रुपयांच्या अमूल्य इंधनाची बचतही होऊ शकते. मात्र त्यासाठी वाहतूक नियमांची कठोर अंमलबजावणी आणि प्रबळ राजकीय इच्छाशक्तीची गरज आहे

**- प्रदीप शंकर मोरे,** अंधेरी

### सध्याच्या काळात वीज हा आवश्यक घटक

बुधवारी पहाटेच्या वेळेपासून पुणे व पिंपरी चिंचवड काही भागात जवळपास पाच तास वीज गायब झाली. यामुळे पिंपरी चिंचवड, चाकण, वाघोली, लोणीकंद येथे वीज पुरवठा खंडित झाला. याचा परिणाम पुणे येतील काही भागात सुद्धा जाणवला. महा पारेषणाच्या चाकण तसेच लोणीकंद येथील अति उच्च दाबाच्या ४०० केव्हीही उपकेंद्राला पुरवठा करणाऱ्या टॉवर लाईन मध्ये ट्रिपिंग झाल्यामुळे वीज प्रवाह खंडित झाल्याचे कळते. यामुळे अनेक गोष्टीवर परिणाम झाला. सध्या अनेक विद्यार्थ्यांचे ऑनलाईन वर्ग चालू आहेत. त्यांना अडथळा निर्माण झाला. इंटरनेट बंद झाल्यामुळे फोन सेवा विस्कळीत झाली. इलेक्ट्रिक गिझर बंद झाल्यामुळे दैनंदिन व्यवहारातील अनेक गोष्टीवर अडचणी निर्माण झाल्या. लिफ्ट बंद झाल्यामुळे अनेक ठिकाणी ज्येष्ठ नागरिकांना अडचणी निर्माण झाल्या. काही ठिकाणी छोटे कारखाने विजेअभावी बंद ठेवावे लागले. यामुळे उत्पादनाचे लाखो रुपयांचे नुकसान झाले. सध्याच्या काळात विजेवर अनेक गोष्टी अवलंबून असल्यामुळे तो एक आवश्यक घटक झालेला आहे. अशा तांत्रिक बिघाडा च्या घटना केव्हातरीच घडतात हे जरी खरे असले तरीही वीज प्रवाह सतत चालू राहणे आवश्यक आहे अलीकडच्या आधुनिक युगात ती आवश्यक बाब आहे. त्याअभावी दैनंदिन व्यवहारात अडचणी ना सामना करावा लागतो ही गोष्ट खरी आहे. वीज पुरवठा सतत चालू राहावा ही दक्षता घेणे जरुरीचे आहे.

**- शांताराम वाघ,** पुणे

### ६५ टक्के विद्यार्थी लसीपासून वंचित



दहावी-बारावीची लेखी परीक्षा अगदी तोंडावर आली आहे, राज्यातील या वर्गाच्या सर्व विद्यार्थ्यांना कोरोना प्रतिबंधात्मक लसीचे दोन्ही डोस परिक्षेपूर्वी द्यावेत असे आदेश शिक्षण मंडळाने दिलेले असतानाही अद्याप फक्त पहिलाच डोस ३५ टक्के विद्यार्थ्यांना देण्यात आला आहे, गत १५ दिवसापासून कोव्हक्सीन डोस कोठेही उपलब्ध नाही, अशात डोस कधी येणार,व उर्वतीत ६५टक्के विद्यार्थ्यांना पहिला डोस कधी देणार?हा मोठा यक्ष प्रश्न आहे, दुसरा डोस तर शक्य नाही मग अशा अवस्थेत हे विद्यार्थी परीक्षा कशी देणार? याबाबत शासनाने तात्काळ कोव्हक्सींन लसीचे डोस पुरविण्याची गरज आहे, ४ मार्च पासून बारावी तर १५ मार्च पासून दहावी परीक्षा आरंभ होत आहे, तर २५ फेब्रुवारी ला बारावी प्रात्यक्षिक व परीक्षा व दहावी प्रात्यक्षिक ही लवकर आरंभ होणार आहेत मग असे असताना व दोन्ही डोस सक्तीचे असतांना हे विद्यार्थी परीक्षेला कसे सामोरे जाणार याबाबत तात्काळ निर्णय घ्यावा, कारण सध्या विद्यार्थ्यांसाठी लस उपलब्ध नाही, पालक वर्ग चिंतीत आहे, विद्यार्थी ही चिंतीत आहे, शासनाने व शिक्षण मंडळाने तात्काळ विद्यार्थी व पालक यांची चिंतीत स्थिती दूर करावी व वाढत असलेला तणाव दूर करावा अशी अपेक्षा आहे.

**- धोंडीरामसिंह राजपुत,** वैजापूर

म ह त्त्वा चे

## राष्ट्रपतींच्या दौऱ्यामुळे गावांचा कायापालट

। रत्नागिरी । वृत्तसंस्था ।

राष्ट्रपतींच्या दौऱ्याच्या अनुषंगाने प्रशासकीय यंत्रणा विविध स्तरांवरील सोयी-सुविधांच्या तयारीवर अंतिम शिक्कामोर्तब करत आहेत. तसेच राष्ट्रपतींचा ताफा ज्या मार्गावरून जाणार आहे, त्यावर काहीही आक्षेपार्ह दिसू नये म्हणून मार्गावरील गावांच्या परिसराची साफसफाई करताना नादुरुस्त फलक काढून प्रवासी शेड यांची तातडीने दुरुस्ती केली आहे. दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर होणारा कायापालट पाहून मंडणगड, तुळशी, पाले, पाचरळ, आंबडवेमधील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने शिरगाव हेलिपॅड ते आंबडवे येथील नियोजित कार्यक्रमाचे स्थळ या अंतरातील रस्त्याची डागडुजी सुरू केली असून ती अंतिम टप्प्यात आहे. रस्त्याच्या बाजूपट्टीवर माती टाकणे, याचबरोबर रस्त्यावरील खड्डे डांबराने बुजवले जात आहेत. याशिवाय रस्त्यावर वाहतुकीसाठी अडथळे येऊ नयेत, याकरिता या अंतरातील सध्या कार्यरत असलेले सर्वच्या सर्व गतिरोधक उखडून टाकण्यात आले असून रस्ता लेवल केला आहे. मंडणगड नगरपंचायतीने बाजारपेठ व नगरपंचायतीचे कार्यक्षेत्रातील अंतरातील रस्त्याचा परिसर स्वच्छ करण्याचा कार्यक्रम गेल्या तीन दिवसांपासून हाती घेतला असून या कामासाठी मंडणगड नगरपंचायतीबरोबर खेड व दापोली तालुक्यातील कर्मचारीही कार्यरत झालेले आहेत.

# लालपरी हळूहळू पूर्वपदावर

### लोकलसह लांब पल्ल्याच्या फेऱ्यांची संख्या वाढली




। सावंतवाडी । वृत्तसंस्था ।

गेल्या तीन महिन्यांहून अधिक काळ सुरू असलेल्या एसटी महामंडळाच्या संपाचे वारे हे कायमच असून, मागील महिनाभरापासून संपाची थोडीफार धग कमी झाल्याचे चित्र आहे. जिल्ह्यातील सात आगारांत महामंडळाचे वाहक, चालक, कर्मचारी असे ३०० पेक्षा अधिक कर्मचारी कामावर रुजू झाले असून, फेऱ्यांच्या संख्याही वाढल्या आहेत, अशी माहिती महामंडळाच्या प्रशासनाने दिली. लोकल फेऱ्यांसह मालवण आगारातून कोल्हापूर, रत्नागिरी या लांब पल्ल्याच्या फेऱ्या सुरू केल्या आहेत. याला प्रवाशांचा प्रतिसादही उत्तम आहे.

गेल्या दिवाळीत राज्यभरातील महामंडळाच्या कर्मचाऱ्यांनी विविध मागण्यांसाठी संप पुकारला होता. या संपात सुरुवातीला चालक, वाहकांसह सर्वच प्रशासकीय कर्मचारी सहभागी झाले होते. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व आगारातील बसची चाके आगारातच अडकून राहिली. याचा फटका महामंडळाच्या उत्पन्नासह 'एसटी'वर अवलंबून असलेल्या सर्वसामान्य नागरिकांना बसला. संपामुळे सतत वर्दळ असलेल्या बसस्थानकांमधील वाहतूकही ठप्प झाली. यामुळे ऐन दिवाळीत नागरिकांना वाहतूक समस्यांचा सामना करावा लागला.

मागील ३ महिन्यांपासून सुरू असलेल्या संपावर तोडगा काढण्यासाठी संपकरी व राज्याच्या बैठकाही झाल्या. यामध्ये कर्मचाऱ्यांना ४१ टक्के पगारवाढ केल्याचे सांगण्यात आले; मात्र काही संघटनांनी विलीनीकरण या मुद्यावर ठाम राहात संप सुरूच ठेवला. त्यानंतर शासनाकडून संपकऱ्यांना 'कारणे दाखवा'च्या नोटीसा देखील बजावल्या. यानंतर मात्र आंदोलनाचे वारे विरळ झाले.

नोटिसीनंतर कर्मचारी कामावर हजर होण्याचे प्रमाण वाढले दरम्यान, मागील महिनाभरापासून कर्मचारी कामावर हजर होण्याचे प्रमाण वाढल्याने हजर झालेल्या वाहक, चालकांच्या जोरावर जिल्ह्यातील काही बसफेऱ्या सुरू करण्यात आल्या. ज्या मार्गावर जास्त प्रवासी वर्ग आहे त्यावरील फेऱ्या प्रथम सुरू करण्यात आल्या. जिल्ह्यातील १०५ फेऱ्याही सुरू करण्यात आल्या आहेत. त्यामुळे काही ग्रामीण भागात एसटीच्या फेऱ्या सुरू झाल्याने ग्रामस्थांनी त्या एसटी वाहक, चालकांचे अभिनंदन देखील केले.

## गोविंदराव निकम विद्यालयात माता पालक मेळावा साजरा



। चिपळूण । वार्ताहर ।

आज महिला सर्वच क्षेत्रात आपले कर्तुत्व सिद्ध करत आहेत. देशाच्या प्रगतीत महिलांचा मोठा वाटा आहे हे सर्वांनी मान्य केले आहे. मात्र अनेक महिलांना आजही अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे त्यांना त्या समस्येतून बाहेर काढण्यासाठी सर्व महिलांनी एकत्र येऊन जनजागृती मोहीम राबविण्याची आवश्यकता आहे. आजची महिला सजग व सक्षम आहे फक्त हातात हात घालून सहकार्याने वाटचाल केली तर महिलांना स्वयंपूर्णतेकडे जाणे सहज शक्य आहे असे प्रतिपादन या कार्यक्रम प्रसंगी चिपळूण पंचायत समितीच्या माजी सभापती व विद्यमान सदस्य पूजा निकम यांनी केले. सह्याद्री शिक्षण संस्था संचलित गोविंदराव निकम माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात हळदी कुंकू व माता पालक मेळावा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रम प्रसंगी सह्याद्री शिक्षण संस्थेच्या आकांक्षा पवार पूजा निकम, दिशा दाभोळकर, समीक्षा बागवे, सावर्डे ग्रामपंचायत सदस्या व परिसरातील प्रतिष्ठित महिला नागरिक आणि सावर्डे विद्यालयातील सर्व महिला शिक्षिका उपस्थित होत्या. अनुजा बागवे यांनी कवितेच्या माध्यमातून आजची स्त्री सर्वांसमोर उभी केली.

## कळंबस्ते-धामणंद मार्गावरील मोऱ्यांची दुरवस्था



|| सार्वजनिक बांधकाम विभागाने लक्ष देण्याची मागणी

। चिपळूण । वार्ताहर ।

तालुक्यातील कळंबस्ते ते धामणंद (ता. खेड ) या मार्गावरील मोऱ्यांची दुरावस्था झाल्याने अपघात घडले आहेत. भविष्यात अपघात टाळण्यासाठी या मोऱ्यांची दुरुस्ती होणे आवश्यक आहे. याकडे सार्वजनिक बांधकाम विभागाने लक्ष द्यावे, अशी मागणी या पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी केली आहे.

कळंबस्ते मार्गावरून खांदाट पाली आंबडस व पंधरागाव विभागाकडे मोठ्या प्रमाणात ये-जा करण्यासाठी वाहनांची वर्दळ असते. मात्र या मार्गावरील मोऱ्यांची दुरावस्था झाली आहे. नुकतेच काही दिवसांपूर्वीच खांदाटपाली येथे डंपर व ट्रक चा मोठा अपघात झाला. मोरी व्यवस्थित नसल्याने दोन्ही वाहने रस्त्यावरून खाली कलंडली. सुदैवाने कोणीही जखमी झाले नाहीत. याचबरोबर खांदाटपालीच्या पुढे आंबडसकडे जाणाऱ्या मार्गावर देखील मोरी नादुरुस्त झाली आहे. या ठिकाणी गेल्या काही महिन्यांपूर्वी दुचाकींचा अपघात होऊन एकाचा मृत्यू झाल्याची घटना देखील घडली होती. यावरून या मोऱ्या किती धोकादायक बनल्या आहेत हे समोर येत आहे. तरीही या मार्गावरील या मोऱ्यांची दुरुस्ती होत नाही, अशी ओरड वाहन चालकांमधून होत आहे. याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता उत्तम कुमार मुळे यांच्याशी संपर्क साधून या मार्गावरील मोर या संदर्भातील विषय सांगितला असता ते म्हणाले की, याबाबत उपअभियंता यांना पाहणी करून योग्य ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत असे त्यांनी सांगितले.

## ५५ व्या निरंकारी संत समागमाचे आयोजन




। चिपळूण । वार्ताहर ।

निरंकारी सद्गुरु माता सुदीक्षाजी महाराज यांच्या पावन सान्निध्यात महाराष्ट्राचा ५५ वा वार्षिक निरंकारी संत समागम ११ ते १३ फेब्रुवारी रोजी व्हर्च्युअल रुपात आयोजित करण्यात आला आहे. या संत समागमाचा आनंद रत्नागिरी जिल्ह्यातील तसेच जगभरातील समस्त भाविक भक्तगण आपापल्या घरातूनच ऑनलाईनच्या माध्यमातून घेऊ शकतील.

दरवर्षी नववर्षाचे आगमन होताच संपूर्ण महाराष्ट्रासह जगभरातील समस्त भाविक-भक्तगणांना भक्ती, प्रेम व आनंद यांच्या अद्भुत संगमाची अलौकिक अनुभूती प्रदान करणाऱ्या या संत समागमाची प्रतिक्षा असते ज्यामध्ये विविध संस्कृती, सभ्यतांचे अनोखे मिलन पहायला मिळते. हा संत समागम आपल्या विविधरंगी छटांमधून अनेकतेत एकतेचे चित्र प्रस्तुत करत विश्वबंधुत्वाची संकल्पना साकार करताना दिसते.

यावर्षी या समागमाचे थेट प्रक्षेपण मिशनच्या वेबसाईटवर सायंकाळी ५.०० ते रात्री ९.३० आणि साधना टी.व्ही.चॅनलवर सायंकाळी ६.०० ते रात्री ९.३० या वेळात करण्यात येणार आहे. प्रथमतःच महाराष्ट्राच्या वार्षिक निरंकारी संत समागमाचे थेट प्रक्षेपण केले जाणार आहे.

समागमाचे थेट प्रक्षेपण होणार असल्याने निरंकारी जगतामध्ये हर्षोल्लासाचे वातावरण निर्माण झाले आहे. याशिवाय समागमाच्या दुसऱ्या दिवशी दुपारी १२.०० ते २.०० या वेळात होणाऱ्या सेवादल रॅलीचेही थेट प्रक्षेपण मिशनची वेबसाईट आणि साधना टी.व्ही.चॅनलवर प्रसारित केले जाणार आहे.

## सावर्डे विद्यालयात लतादीदींना श्रद्धांजली



। चिपळूण । वार्ताहर ।

सह्याद्री शिक्षण संस्था संचलित गोविंदराव निकम माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात गानकोकिळा लता मंगेशकर यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

याप्रसंगी रत्नागिरी जिल्हा परिषद सदस्या दिशा दाभोळकर, चिपळूण पंचायत समितीच्या माजी सभापती व विद्यमान सदस्या पूजा निकम, सह्याद्री शिक्षण संस्थेच्या संचालिका आकांक्षा पवार, रफिक मोडक, समीक्षा बागवे, समीया मोडक, नेहा मेस्त्री व सावर्डे गावच्या प्रतिष्ठित महिला नागरिक उपस्थित होते.

याप्रसंगी सुरुवातीला सर्व उपस्थितांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून स्व.लता मंगेशकर यांना श्रद्धांजली अर्पण केली. लतादीदी यांची आठवण म्हणून वैशाली पाटील,अमृता घाग, सौ. नलावडे, ईश्वरी डंबे यांनी लतादीदींची सुप्रसिद्ध गीते सुंदर स्वरात गायली.

## 'संरक्षण भिंत उभारल्याशिवाय परशुराम घाटाचे काम करु नये '



। चिपळूण । वार्ताहर ।

दोन दिवसांपूर्वी परशुराम घाटात दरड कोसळून पोकलेन मशिनमधील एक कामगाराचा मृत्यू झाला होता. याबाबत आमदार शेखर निकम यांनी परशुराम घाटातील कामाच्या ठिकाणी भेट देऊन पाहणी केली. यावेळी पेढे गावच्या बाजूला जेवढा धोकादायक भाग आहे तिथे ५ मीटर उंचीची भिंत उभारल्याशिवाय सदर महामार्गाचे काम न करण्याच्या सूचना आमदार निकम यांनी केल्या.

यावेळी कल्याण टोलवेज कंपनीचे ठेकेदार, तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग महाडचे मुख्य अभियंता बांगर, अभियंता माडकर, चिपळूण बांधकामचे रॉजर मराठे, नायब तहसीलदार तानाजी शेजाळ, पोलीस निरीक्षक रवींद्र शिंदे, विश्वास सुर्वे, प्रवीण पाकळे,तुषार गमरे, मोहन शिंदे, सुधीर भोसले व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सदर प्रसंगी आमदार निकम यांनी मृत्यू पावलेल्या कामगाराची माहिती घेतली. मागील आठवड्यात घाटातून भलामोठा दगड पेढे गावात कोसळला होता. सुदैवाने जीवितहानी टळली होती. त्याचवेळी आमदार निकम यांनी संबधित यंत्रणेला ग्रामस्थांच्या सुरक्षिततेची काळजी घेऊन नंतरच घाटातील काम करण्याच्या स्पष्ट सूचना केल्या होत्या. आता यापुढे पेढे गावातील एक कमिटी नियुक्त केली असून त्यांच्याकडे संपर्क करूनच पुढील कामकाज करण्याच्या सूचना देखील आमदार यांनी दिल्या आहेत. १० फेब्रुवारीला भूगर्भ विभागाच्या अधिकारी यांनी सदर ठिकाणी भेट देऊन पाहणी केली.

देश-विदेश

# मोदींकडून महाराष्ट्राचा अपमान

### काँग्रेसकडून राज्यभरात आंदोलने
### नितीन गडकरी यांच्या घरावर मोर्चा



। मुंबई । वृत्तसंस्था ।

महाराष्ट्रातून मजुरांना घाईघाईत त्यांच्या गावी पाठवण्यात आल्यामुळे देशभरात कोरोनाचा प्रसार झाला असे वक्तव्य करणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा भाजपच्या नेत्यांनी बचाव करु नये. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना महाराष्ट्रातील जनतेची माफी मागण्यास सांगावे, असे वक्त व्य काँग्रेसचे प्रवक्ते अतुल लोंढे यांनी केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महाराष्ट्राबाबत केलेल्या वक्तव्याच्याविरोधात काँग्रेसकडून गुरुवारी राज्यभरात आंदोलन करण्यात आले. यावेळी नागपूरमध्ये केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या घरावर काँग्रेस कार्यकर्त्यांनी मोर्चा काढला. याला प्रत्युत्तर देण्यासाठी भाजपचे कार्यकर्तेही मोठ्या संख्येने याठिकाणी जमले होते. त्यामुळे नितीन गडकरी यांच्या नागपुरातील घराबाहेर सध्या काँग्रेस आणि भाजप कार्यकर्त्यांचा प्रचंड गोंधळ सुरु आहे. या पार्श्वभूमीवर लोंढे यांनी भाजपवर जोरदार टीका केली. मोदी संसदेत महाराष्ट्रावर टीका करत होते तेव्हा राज्यातील भाजप खासदार बाकं वाजवत होते. तेव्हा महाराष्ट्रातील भाजपच्या खासदारांना लाज वाटली नाही का, असा सवाल लोंढे यांनी विचारला. गडकरी यांच्या घराबाहेर काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना विरोध करणारे भाजप कार्यकर्ते महाराष्ट्राचा स्वाभिमान आणि अस्मितेविरुद्ध उभे आहेत.

महाराष्ट्राचा अपमान होऊनही भाजपचे नेते मोदी यांचा बचाव करत आहेत. याऐवजी भाजपच्या कार्यकर्त्यांनी काँग्रेससोबत मिळून गडकरी यांच्याकडे विनंती करायला हवी होती. गडकरी यांना सांगून पंतप्रधान मोदी यांना माफी मागायला सांगितली पाहिजे होती. ते अधिक संयुक्तिक ठरले असते. त्यामुळे महाराष्ट्रात चांगला संदेश गेला असता, असे अतुल लोंढे यांनी म्हटले.आपण सतत महाराष्ट्राचा अपमान करु शकतो. राज्याच्या अस्मितेश कसंही खेळू शकतो, असे भाजपच्या नेत्यांना वाटते. पण महाराष्ट्राचा अपमान काँग्रेस खपवून घेणार नाही. त्यामुळेच आम्ही नितीन गडकरी यांच्या घराबाहेर आंदोलन करत आहोत. काँग्रेसचे कार्यकर्ते आंदोलन करताना हिंसा करणार नाहीत, असेही लोंढे यांनी सांगितले.

## पत्नी, सासरच्या त्रासाला कंटाळून जवानाची आत्महत्या

। पुणे । वृत्तसंस्था ।

वानवडी परिसरातील सैन्य दलाच्या आर्म्ड फोर्सेस मेडिकल कॉलेजमध्ये भरती नर्सिंग सहायक पदावर कार्यरत असलेल्या जवानाने पत्नी व सासरच्या जाचाला कंटाळून आत्महत्या केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी वानवडी पोलीस ठाण्यात पत्नीसह सासरच्या व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गोरख नानाभाऊ शेलार असे आत्महत्या केलेल्या जवानाचे नाव आहे. या प्रकरणी शेलार यांची पत्नी अश्विनी युवराज पाटील, युवराज पाटील, संगीता युवराज पाटील, योगेश युवराज पाटील, भाग्यश्री पाटील यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत केशव नानाभाऊ पाटील (शेलार) यांनी तक्रार दिली आहे. पोलीस उपनिरीक्षक विशाल मोहिते यांनी दिलेल्या माहितीनुसार, केशव पाटील यांचा भाऊ गोरख शेलार भारतीय सैन्य दलामध्ये भरती नर्सिंग सहायक पदावर कार्यरत होते. गेल्या वर्षी गोरख यांचे शेतकरी कुटुंबातील अश्विनी पाटील हिच्यासोबत लग्न झाले. गोरख यांची घरची परिस्थिती बेताची होती. त्यांच्या लहानपणी वडिलांचे निधन झाले होते. आईने आणि भावाने त्यांना कष्ट करून शिकवले. त्यानंतर गोरख सैन्यदलात भरती झाले. अश्विनी गोरख यांना वारंवार मानसिक त्रास देत होती. गर्भवती राहिल्यानंतर तिने गर्भपात करण्याचीही धमकी दिली; परिवारावरही गुन्हा दाखल करण्याची धमकी गोरख यांना दिली. अश्विनीला सोडचिठ्ठी देण्यासाठी १५ लाख रुपयांची मागणी अश्विनीच्या परिवाराने केली होती. या त्रासाला कंटाळून गोरख यांनी सहा फेब्रुवारी रोजी एएफएमसी सैनिकी आवास येथे आत्महत्या केली. या प्रकरणी पोलीस उपनिरीक्षक विशाल मोहिते तपास करीत आहेत.

## मंगेशकर कुटुंबियांची मुंबई विद्यापीठावर नाराजी



। मुंबई । वृत्तसंस्था ।

प्रख्यात गायिका लता मंगेशकर यांच्या स्मारकावरून सुरू झालेला वाद ताजा असतानाच मुंबई विद्यापीठाने संगीत संशोधन केंद्राला लता मंगेशकर यांचे नाव दिल्याने नव्या वादाला तोंड फुटले आहे. विद्यापीठाने परवानगीविना नाव वापरल्याने मंगेशकर कुटुंबीयांनी पत्राद्वारे कुलगुरूंकडे नाराजी व्यक्त केली आहे.

प्रख्यात गायिका लता मंगेशकर यांच्या नावे 'सेंटर फॉर एक्सलेंस इन लाइट म्युझिक' हे अभ्यास आणि संशोधन केंद्र स्थापन करण्याच्या विद्यापीठाच्या निर्णयाला मंगेशकर कुटुंबियांनी विरोध दर्शवला आहे. मंगेशकर कुटुंबियांचे स्वप्न असलेल्या आणि राज्य सरकारने परवानगी दिलेल्या 'मास्टर दीनानाथ मंगेशकर आंतरराष्ट्रीय शासकीय संगीत महाविद्यालया'साठी विद्यापीठाने जागा देण्यास नकार दिल्याने लता मंगेशकर यांचे स्वप्न पूर्ण होऊ शकले नाही. त्यामुळे आता त्यांच्या नावे कोणतेही उपक्रम परस्पर हाती घेऊ नयेत, असे पत्र मंगेशकर कुटुंबियांनी कुलगुरू सुहास पेडणेकर यांना दिले आहे.

लता मंगेशकर यांच्या नावे अध्यासन केंद्र सुरू करण्यापूर्वी मंगेशकर कुटुंबीयांना विश्वासात घेणे अपेक्षित होते. हा निर्णय आम्हाला मान्य नसून यापुढे लता मंगेशकर यांच्या नावे कोणताही उपक्रम परस्पर हाती घेऊ नये, असेही मंगेशकर कुटुंबियांनी कळवले आहे.

## दाट धुक्यामुळे महापारेषणच्या वाहिन्यांत तांत्रिक बिघाड



। पुणे । प्रतिनिधी ।

दाट धुक्यामुळे महापारेषणच्या वाहिन्यांत तांत्रिक बिघाड होऊन पुणे व परिसरातील काही भागात वीजपुरवठा खंडित झाला. दाट धुक्यामुळे ४०० के. व्ही. चाकण व ४०० के. व्ही. लोणीकंद या पुण्यातील मुख्य ग्रहणकेंद्राकडे येणारा वीजपुरवठा खंडित झाला. यामुळे अन्य ४०० के. व्ही. तसेच २२० के. व्ही. वाहिन्या बंद होऊ नयेत म्हणून पुणे शहर, बारामती, चाकण व औद्योगिक क्षेत्रामध्ये भारनियमन करावे लागले. दरम्यान, महापारेषणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी युध्दपातळीवर प्रयत्न करून अत्यावश्यक सेवा असणाऱ्या रूग्णालये, पाणीपुरवठा, ऑक्सीजन प्लँट, रेल्वेसेवा, विमानसेवा या क्षेत्रात मात्र वीजपुरवठा सुरळीत ठेवला.

महापारेषणच्या पुणे विभागातील महत्त्वाच्या ४०० के. व्ही. पारेषण वाहिन्यांपैकी ४०० के. व्ही. तळेगाव-चाकण, ४०० के. व्ही. लोणीकंद-चाकण, ४०० के. व्ही. लोणीकंद-कर्जत१, ४०० के. व्ही. लोणीकंद-कर्जत २ व ४०० के. व्ही. लोणीकंद-कराड या वाहिन्यांमध्ये दाट धुक्यांमुळे इन्सुलेटर डिकॅपिंग होऊन वीजपुरवठा खंडित झाला. दरम्यान, या वाहिन्यांची महापारेषणकडून नियमितपणे देखभाल केली जाते.

ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत, व्यवस्थापकीय संचालक दिनेश वाघमारे यांनी वेळोवेळी याबाबत माहिती घेऊन वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक त्या सूचना व मार्गदर्शन केले. संचालक अनिल कोलप, पुणे परिमंडळाचे मुख्य अभियंता जयंत विके यांच्या मार्गदर्शनाखाली अधिकारी व कर्मचाऱ्यांनी युध्दपातळीवर प्रयत्न करून वीजपुरवठा पूर्ववत व सुरळीत केला.

## विठुरायाच्या भेटीला भाविकांची मांदियाळी

। पंढरपूर । प्रतिनिधी ।

माघी यात्रेच्या निमित्ताने श्री विठ्ठल दर्शनासाठी लाखोच्या संख्येने भाविक दाखल झाले आहेत. पंढरपूर मध्ये प्रमुख चार वाऱ्या पैकी एक असलेली माघ वारी तब्बल दोन वर्षानंतर भरू लागली आहे. राज्याच्या विविध भागातून लाखोच्या संख्येने भाविक पंढरपूर मध्ये दाखल होत आहेत.श्री विठ्ठलाच्या दर्शनाची रांग पाच किलोमीटर लांब गेली आहे. माघ वारी १२ फेब्रुवारी रोजी साजरी होणार आहे. कोरोना संसर्ग कमी झाल्याने ही वारी भरत आहे. त्यामुळे भाविकांमधुन समाधान व्यक्त होत आहे.राज्याच्या विविध भागातून लाखोच्या संख्येने भाविक पंढरपूर मध्ये दाखल होत आहेत.श्री विठ्ठलाच्या दर्शनाची रांग पाच किलो मिटर लांब गेली आहे.

## ऑस्ट्रेलियात मराठी टक्का वाढला

। मेलबर्न । वृत्तसंस्था ।

जगभरातील अनेक देशांमध्ये मराठी माणसं रोजगार, व्यवसायाच्या निमित्ताने स्थायिक झाला आहे. परदेशात राहूनही अनेकांनी महाराष्ट्राच्या मातीशी असलेली सांस्कृतिक नाळ कायम ठेवली आहे. ऑस्ट्रेलियातही मराठी भाषिक बऱ्यापैकी आहेत. मात्र, त्यांनी घेतलेल्या एका निर्णयाची सोशल मीडियावर जोरदार चर्चा सुरू आहे. सध्या ऑस्ट्रेलियात जनगणना सुरू आहे. या जनगणनेत मराठी टक्का दिसणार आहे. घरात बोलली जाणारी भाषा म्हणून मराठी म्हणून आवर्जून लिहीण्याचे आवाहन व्हिक्टोरियातील महाराष्ट्र मंडळाने केले आहे.

महाराष्ट्र मंडळ व्हिक्टोरिया यांनी ऑस्ट्रेलियातील मराठी बांधवांना खास आवाहन केले आहे. वैयक्तिक संपर्क, सोशल मीडियाच्या माध्यमातून मराठी माणसांशी संपर्क साधला जात आहे. ऑस्ट्रेलियात सध्या जनगणना सुरू असून विविध माहिती घेतली जाते.मराठी भाषिकांकडून या रकान्याकडे दुर्लक्ष केले जात होते.

ऑस्ट्रेलियातील मेलबर्नमध्ये मराठी भाषिकांची संख्या अधिक आहे.व्हिक्टोरियातील महाराष्ट्र मंडळाचे अनेक सदस्य आहेत. व्हिक्टोरियातील महाराष्ट्र मंडळाच्यावतीने मराठीची नोंद करण्याबाबत पुढाकार घेतला असल्याचे अध्यक्ष यशवंत जगताप यांनी सांगितले. ऑस्ट्रेलियातील जनगणनेत घरात कोणती भाषा बोलतात हा रकाना असतो. रकान्यात मराठी भाषेचा उल्लेख करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# माथेरानमधील गॅस शवदाहिनी नादुरूस्त



## मृतांवर अंत्यसंस्कार करण्यासाठी येतात अडचणी

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरानयेथील हिंदूस्मशानभूमी मधील गॅस शवदाहिनी नादुरुस्त झाली आहे. त्यात माथेरानमध्ये इको सेन्सेटिव्ह झोनमुळे लाकडे तोडण्यास बंदी आहे. त्यामुळे मृतांवर अंत्यसंस्कार करण्यास अनेक अडचणी येत आहेत. तर दुसरीकडे मृतांवर अंत्यसंस्कार करण्यासाठी स्थानिक श्रमदान करून लाकडांचे ओंडके वाहून स्मशानभूमी पर्यंत नेत आहेत.

माथेरानमध्ये सर्व हिंदू समाजातील व्यक्तींसाठी येथे एकमेव स्मशानभूमी आहे. याचा वापर येथील सर्व समाज यांच्याकडून केला जातो. या स्मशानभूमीमध्ये डिझेलवर चालणारी शवदाहिनी आहे. तसेच लाकडावर जाळण्याची व्यवस्था देखील आहे. मागील काही महिन्यांपासून येथील डिझेलवर चालणारी शवदाहिनी ही नादुरूस्त झाली आहे. तसेच त्याठिकाणी लाकडांची अपुरी व्यवस्था असल्याने मृतदेहावर अंत्यविधी करण्यास अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. याकरिता ही नादरूस्त झालेली शवदाहिनी त्वरित दुरूस्त करून सुरू करावी अशी मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान येथे अंत्यसंस्कार वेळेस लाकडाचा तुटवडा भासू नये यासाठी गावातील नागरिकांना एकत्रित करून श्रमदानातून लाकडांचा डेपो स्मशानभूमीत तयार केला आहे. माथेरान गिरीस्थान नगरपालिका अंतर्गत वैशिष्ट्यपूर्ण योजनेच्या अनुदानातून बसविण्यात आलेली डिझेल शवदाहिनी गेल्या महिन्यापासून बंद अवस्थेत आहे. यापूर्वी सदरची बाब वारंवार नगरपालिकेच्या निदर्शनास आणली होती. परंतु संबंधित विभागाकडून कोणतीही दखल घेतली गेली ना याबाबत तात्काळ योग्य ती कारवाई नागरिकांच्या धार्मिक, हक्काकरिता जनआंदोलन पुकारले जाईल अशी माहिती ग्रामस्थांकडून देण्यात आली आहे.

---

**म ह त्वा चे**

### वाजेकर पुण्यतिथी समारंभाचे आयोजन

**उरण :** रयत शिक्षण संस्थेच्या तु. ह. वाजेकर विद्यालय आणि वीर वाजेकर ए.एस.सी. कॉलेज, महालण विभाग फुंडे यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१५ फेब्रुवारी रोजी वाजेकर पुण्यतिथी समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून आमदार बाळाराम पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. पी.जे पाटील, कृष्णाजी कडू, भावना घाणेकर, सुधीर घरत हे मान्यवर उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. जी. पवार यांनी दिली आहे.

### उरणमध्ये आंतरराष्ट्रीय परिषद

**। उरण । वार्ताहर ।**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील वाणिज्य विभागाच्या वतीने कोरोना काळातील व कोरोनानंतरच्या काळातील सेवा क्षेत्रातील आव्हाने आणि संधी या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन शनिवारी ऑनलाईन मोडवर केले आहे. या आंतरराष्ट्रीय परिषदेत अमेरिकेचे डॉ.डेव्ह ओ.गोरमन विद्यमान कॅम्बेडिया हे सन्माननिय अतिथी आहेत. तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. राजेश जयपूरकर माजी प्र-कुलगुरू संत गाडगेबाबा, अमरावती विद्यापीठ, अमरावती उपस्थित राहणार आहेत.

---

# श्रीवर्धनमध्ये सोमजाईदेवी मंदिराचे बांधकाम वेगात

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

श्रीवर्धनमधील श्री सोमजाईदेवी मंदिर तीर्थक्षेत्र विकसित करण्याच्या कामाला जोमाने सुरुवात झाली असून सर्वप्रथम योजनेच्या आराखड्यात उल्लेखित भक्तनिवासाच्या कामाला सुरुवात करण्यात आलेली आहे..



या मंजूर योजनेच्या कामकाजासंबंधी श्रीवर्धन नगर परिषदेचे मुख्याधिकारी विराज लबडे व स्थापत्य अभियंता विनायक चौगुले चांनी दिलेल्या माहितीनुसार सव्वा सहा कोटी रुपयांच्या निधीची गरज असून, त्यापैकी शासनाकडून ४ कोटी १८ लाख रूपयांचा निधी मंजूर झाला आहे. तर उर्वरित खर्च श्रीवर्धन नगरपालिका आणि श्री सोमजाई देवस्थान प्रत्येकी १ कोटी ३ लाख खर्च करणार आहे. नियोजनानुसार सर्व तीर्थक्षेत्र विकास पूर्ण करुन नगर परिषदेने ते देवस्थान ट्रस्टकडे हस्तांतरित करावयाचे आहे. सर्व कामकाज योजनेप्रमाणे पूर्ण करण्याची मुदत दोन वर्षे इतकी आहे.

मंदिराच्या गर्भगृहाच्या दुरुस्तीमध्ये कळसाचे काम करण्यात येणार असून त्यापुढील मंडप तसाच राहून श्री हनुमान मंदिराच्या कळसाचे काम करण्यात येणार आहे. तसेच सध्याची जी होळीची जागा आहे त्या अंगणात पूर्वेच्या बाजूला भक्त निवासाचे काम सुरु करण्यात आले असून भक्त निवासाची तळमजला अधिक दोन मजले असलेली इमारत व कंपाऊंड वॉल प्रस्तावित आहे. तसेच कंपाऊंड वॉल व प्रवेशद्वार कमान प्रस्तावित आहे. भक्तनिवासामध्ये स्वच्छता गृह, जिना, डॉर्मिटरी, सभागृह, भक्तांसाठी पहिल्या दोन मजल्यांवर परिपूर्ण खोल्या, पहिल्या मजल्यावर ट्रस्टचे कार्यालय इ.व्यवस्था होणार आहेत. यासाठी खा.सुनील तटकरे यांनी विशेष प्रयत्न केलेले आहेत.

### कळंबोली येथे रोजगार मेळावा

**। उरण । वार्ताहर ।**

पनवेल शहर जिल्हा राष्ट्रवादी युवक काँग्रेस रोजगार व स्वयं रोजगार विभागातर्फे रविवारी (१३ फेब्रुवारी) सकाळी १० ते दुपारी ४ दरम्यान न्यू इंग्लिश स्कुल कळंबोली, द. ग. तटकरे प्लॉट नंबर ५, सेक्टर ५ ई, कळंबोली (नवी मुंबई) येथे भव्य दिव्य असे नोकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. रोजगार मेळाव्याचा लाभ घ्यावा असे आवाहन संयोजक सूरदास गोवारी, आयोजक संतोष शेट्टी यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी ९८३३६८८५७३ या नंबरवर संपर्क साधावे.

### रसायनीत पोलिसांतर्फे हेल्मेटचे वाटप



**। रसायनी । वार्ताहर ।**

रसायनी पोलीस ठाणे आणि जय प्रेसिजन प्रोडक्ट इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय रस्ता सुरक्षा सप्ताह अभियान राबविण्यात आले.

पोलीस ठाण्याजवळच सिद्धेश्वरी पराडे रस्त्यावर जय प्रेसिजन कंपनीचे पदाधिकारी आणि पोलीस अधिकारी यांच्या हस्ते रस्त्यावरुन दुचाकी घेऊन जाणाऱ्या दुचाकीस्वारांना हेल्मेट वाटप करण्यात आले. वरिष्ठ पोलीस निरीक्षक कैलास दादाभाऊ डोंगरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोज दत्तात्रेय गुंड, पोलीस नाईक मंगेश लांगी, पोलीस नाईक विशाल झावरे, पोलीस भुपेश वेल्हे आदींसह महिला पोलीस कर्मचारी व जय प्रेसिजन कंपनीचे पदाधिकारी उपस्थित होते.

---

# खामगावमध्ये फेरफार अदालत



**। आंबेत । वार्ताहर ।**

महाराज्स्व अभियानांतर्गत रायगड जिल्ह्यातील म्हसळा तालुकांतर्गत खामगाव तलाठी मंडळ कार्यालयात तहसीलदार स्तरावर फेरफार अदालतीचे आयोजन करण्यात आले होते. सर्व मुदत पुर्ण झालेल्या प्रलंबित फेरफार यामध्ये ११ फेरफार २७ सात बारा मंजूर करून त्यांचे वाटप करण्यात आले. ही प्रकरणे निकाली काढून त्यांचे वाटप खामगाव तलाठी मंडल कार्यालयात करण्यात आले. उपविभागीय अधिकारी अमित शेडगे तसेच म्हसळा तहसीलदार समीर घारे यांच्या आदेशानुसार म्हसळा मंडळ अधिकारी सलीम शहा, तलाठी जे.आर.शेळके, तलाठी आंबेत, पाष्टी एस जे सोरे, तलाठी, पांगलोली / कोंझरी/ पांगलोली पी एच कळंबे, तलाठी वावे/भापट कृषी अधिकारी देवरे उपस्थित होते.

### उपायुक्त गावडे यांचा सत्कार

**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल महानगरपालिकेच्या उपायुक्तपदी कैलास गावडे यांची नियुक्ती झाल्याबद्दल खांदा वसाहत सकल मराठा समाज बांधवांच्यावतीने त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांना शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी सदानंद शिर्के, संतोष जाधव, शिवाजी दांगट, ओंकार गावडे, विश्राम एकंबे, बी.आर. कदम, रमेश बांदल, ओमकार जाधव, विशाल काळे आदी मराठा समाज बांधव उपस्थित होते.

### रोठ ग्रा.पंचायतीतर्फे कचरा कुंड्यांचे वाटप

**। खांब-रोहे । वार्ताहर ।**

रोहे तालुक्यातील रोठ खु.ग्रा. पंचायतीचे वतीने कचरा कुंडी वाटपाचा कार्यक्रम ग्रा. पंचायत सभागृहात मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आला.

संपूर्ण ग्राम स्वच्छता अभियान या उद्दिष्टांनुसार व १५ वित्त आयोग निधीतून सदर कचराकुंडींचे वाटप सरपंच गीता मोरे व उपसरपंच सुनीता मोरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सदस्य सचिन मोरे, राकेश मोरे, महेंद्र कांबळे, हर्षाली कांबळे, सुनीता डाके, जनार्दन मोरे, सामाजिक कार्यकर्ते लिलाधर मोरे, हरिश्चंद्र मोरे, प्रकाश डाके, मंगेश मोरे आदी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी ग्रा.विस्तार अधिकारी डी.एच.सावंत यांचे मोलाचे सहकार्य लाभले. तर १५ वित्त आयोग अंतर्गत ग्रा.पंचायतीने राबविलेल्या या अभिनव उपक्रमाचे महिला वर्गातून स्वागत करण्यात येत आहे.



### कापोलीत सभागृहाचे भूमीपूजन

**। कापोली । वार्ताहर ।**

श्रीवर्धन तालुक्यातील कापोली येथील गणेश मंदिरासमोर सभागृहाचे भूमीपूजन माजी सभापती मीना गाणेकर यांच्या प्रयत्नाने पार पाडले. यावेळी बाबूराव चोरगे, अनिल नवगणे, माजी आमदार तुकाराम सुर्वे, शामभाऊ भोकरे, अविनाश कोलंबेकर, संदेश म्हसकर, कुमार गाणेकर, नूरजहाँ रफीक, जहांगिरदार, ग्रामस्थ मंडळ कापोलीचे अध्यक्ष सुरेंद्र भायदे, जगदंबा मंडळ अध्यक्ष वसंत पाटील व ग्रामस्थ उपस्थित होते.

---

# नाईक महाविद्यालयाचा पदवीदान सोहळा



**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

वसंतराव नाईक कला आणि वाणिज्य महाविद्यालय तसेच बॅ. ए. आर. अंतुले विज्ञान महाविद्यालय म्हसळा येथे बॅ.अंतुले यांची जयंती आणि पदवीदान समारंभ कार्यक्रम संपन्न झाला.

म्हसळा मुस्लिम समाज अध्यक्ष अहमद अली पेनकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या पदवीदान समारंभास तहसीलदार समीर घारे, पोलीस निरीक्षक उद्धव सुर्वे, मुख्यमंत्री ग्रामिण विकास अधिकारी सचिन निकम, सभापती छाया म्हात्रे, फझल हलदे, नसीर मिठागरे, गटशिक्षणाधिकारी मंगेश साळी, निलम वेटकोळी, हादेव पाटील, आहे. अ. रजाक मेमन, शकूर घनसार, बाबाजान पठाण, शौकत घरटकर, ए. आय. जे. चे प्राचार्य तांबे, सलाम हलदे, किशोर मोहिते, प्राचार्य एम. एस. जाधव, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आदि मान्यवर उपस्थित होते.


### आईचा स्मृतीदिन वृद्धाश्रमात साजरा

**। उरण । वार्ताहर ।**

भेंडखळ उरण येथील राजेंद्र ठाकूर व शशिकला ठाकूर यांनी आपली आई हिरावती काशिनाथ ठाकूर यांचा पहिला स्मृतीदिन करुणेश्वर वृद्धाश्रमातील वृद्धांसोबत साजरा केला. वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांची आस्थेने विचारपूस करीत त्यांना भोजनही दिले.तसेच दैनंदिन गरजा भागविण्यासाठी काही वस्तूही भेट दिल्या. यावेळी संस्थेचे संचालक श्री ईश्वर ढोरे आणि सौ करुणा ढोरे या उपस्थित होत्या.



# रोह्यामध्ये डोंगरांना वणवेच वणवे



### देवकान्हे, पुई, खांब परिसरात वनसंपदेची हानी

**। गोवे-कोलाड । वार्ताहर ।**

रोहा तालुक्यात वणवे लावण्याच्या प्रमाणात आता प्रचंड वाढ झाली असून अक्षरशः तालुकतातील डोंगरच्या डोंगर आगीच्या भस्मस्थानी होरपळतांना दिसत आहेत. त्यामुळे प्रचंड वनसंपदेची हानी होत असल्याने येथील जैवविविधता धोक्यात आली असून याकडे वनखात्याचे दुर्लक्ष व डोळे झाक होत असल्याचे चित्र सर्वत्र पहावयास मिळत आहे .

दररोज डोंगरांना प्रचंड लावण्यात येत असलेल्या वणव्यामुळे रोहा तालुक्यातील कोलाड पुई, आंबेवाडी, वरसगाव, खांब, देवकान्हे, मालसई, या ठिकाणचे डोंगर सायंकाळच्या सुमारास अक्षरशः या वणव्यात होरपळताना दिसतात. शिकार करणे व इतर कामासाठी डोंगरांना वणवे लावण्याचा प्रमाण वाढत आहे.

वणवे लावल्यावर कुणाचाही अंकुश नसल्याने व कायद्याचा धाक नसल्याने लाकडे चोरटे अथवा हातभट्टीदार यांचे अधिक फावत आहे. शिकार करणे, वृक्षतोड करणे, वनसंपदा मिळवणे तसेच सरपणासाठी लागणारा लाकूडफाटा यामुळे वणवे लावले जात असले तरी हे कायद्याच्या चौकटीत बसत नसून सुद्धा वनखाते उदासीन दिसत असून वणवे लावणाऱ्यावर कधीही कारवाई झाल्याचे आजतागत दिसुन येत नाही अथवा त्यांना पकडण्यास वनविभाग खाते अपयशी ठरत आहे.

### मुरुडमध्ये अंतुले यांची जयंती

**। मुरुड । वार्ताहर ।**

माजी मुख्यमंत्री बॅ. ए.आर. अंतुले यांच्या जयंतीनिमित्त बुधवारी मुरुड येथील वसंतराव नाईक महाविद्यालयात एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मुनाफ हाकिम, डॉ. गजानन देसाई, चंद्रकांत पाटील, श्रीरंग बरगे, राजाभाऊ ठाकूर, ॲड. इस्माईल घोले, सुभाष महाडिक, वासंती उमरोटकर, प्राचार्य डॉ. व्ही.बी.चव्हाण, प्रीतम पाटील, नाना गुरव, चेअरमन अल्ताफ मलिक,असगर दळवी,तालुका उपाध्यक्ष सुदेश वाणी, सर्व महाविद्यालय कर्मचारी वृंद मोठ्या प्रमाणात हजर होते. सूत्रसंचालन डॉ. नारायण बागुल यांनी केले.



---


## क्लासिफाईड

*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- पाहिजेत स्टाफ नर्स जन्नावार हॉस्पिटल, बाय पास रोड चेंढरे, अलिबाग. ९४२३८९०३१०
- विवाह, पुर्नविवाह सर्वजातीय आंतरजातीय स्थळांसाठी रोहा गणेश महाकाळ. ८८८८९३५७७५, ९२७०४३३४८७
- श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधली अडचण फोन नं. ९९६०४५६९८६/८८०६४७९१७३, अलिबाग
- वधु २५ वर्ष, ५-३ एफ. वाय.बी.ए. तीन बहिणी, त्वरित लग्न ७०३८४३८५०३
- अलिबागमध्ये कॉफी शॉपमध्ये कामासाठी मुलगा पहिजे- संपर्क- ८६९८५०३८८८
- वरसोली बिच रोड येथे 1BHK फुल फर्निश ब्लॉक विकणे आहे. नंबर- ८८०५५४०४६४

**जाहिरातीसाठी संपर्क**

☎ (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


# आरोग्यदायी ताडगोळ्यांचा गोडवा महागला

## १०० रुपयांना आठ ताडगोळे



**। पाली/बेणसे । वार्ताहर ।**

पाली सुधागडसह जिल्ह्यात सध्या ताडगोळे काही प्रमाणात विक्रीसाठी येऊ लागले आहेत. मात्र गेल्यावर्षी या १०० रुपयांना एक डझन मिळणारे ताडगोळे यंदा १०० रुपयांना अवघे ८ किंवा ९ मिळत आहेत. ताडगोळ्यांचा हंगाम सुरू होण्यास अजून अवकाश आहे. शिवाय वातावरणात देखील बदल झाला आहे. उत्पादन कमी आहे. त्यामुळे किंमती वाढल्या आहेत. तरीदेखील हंगामात पहिल्यांदा आलेले ताडगोळे खवय्ये आवर्जून खात आहेत.

जिल्ह्यात अलिबाग, श्रीवर्धन, मुरुड आदी तालुक्यात ताडगोळ्यांचे मुबलक उत्पादन होते. येथून काही महिला विक्रेत्या किंवा विक्रेते जिल्ह्यात इतरत्र ताडगोळे विक्रीसाठी जातात. तर काही जण छोट्या टेम्पोत ताडगोळे घेऊन विविध बाजारात जातात किंवा महामार्गाच्या कडेला विक्रीसाठी बसतात. ग्राहक आल्यावर त्यास आवरण काढून ताजे ताडगोळे काढून दिले जातात. यामुळे ग्राहक देखील खुश होतात. ताडगोळे हे हंगामी फळ आहे. उन्हाच्या काहिली पासून दूर राहण्यासाठी थंडगार व मधुर ताडगोळे खायला सर्वांना आवडतात. मात्र सध्या थंडी सुरू आहे. तरी दुपारी वातावरणात उष्मा वाढत आहे. तसेच ते आरोग्यदायी देखील आहेत. परिणामी शरीराला थंडावा देण्यासाठी बहुतांश लोक ताडगोळे खरेदी करत आहेत.

> उत्पादन कमी तसेच हंगाम सुरू होण्यास अवधी असल्याने यावर्षी ताडगोळ्याची किंमत वाढली आहे. छोटा पिकअप टेम्पो घेऊन महामार्गाच्या कडेला ताडगोळ्यांचा विक्री करतो. लोक आवर्जून खरेदी करतात.
>
> – महेंद्र खारकर, ताटगोळे विक्रेता,

### चविष्ट, गुणकारी व आरोग्यदायी ताडगोळे

ताडगोळ्यामध्ये व्हिटॅमिन्स, मिनरल्स, लोह, झिंक, पोटॅशिअम, फॉस्फरस, कॅल्शिअम असे अनेक गुणधर्म असतात. उन्हाळ्यात शरीराला थंडावा देण्यापासून उपयुक्त. मधुमेही व हृदयविकार असलेली माणसे देखील ताडगोळे खाऊ शकतात. यामुळे पचनशक्ती सुधारते. पोटात गॅस होणे, अपचन, पोटदुखी, जळजळ, बद्धकोष्ठता, मुळव्याध असे त्रास यामुळे कमी होतात. ताडगोळे खाण्यामुळे त्वचेला पुरेसे पोषण मिळते. शारीरिक थकवा कमी होतो. शरीराला योग्य उर्जेचा पूरवठा होतो.

# तुपगावात पेंढ्याचे भारे जळून खाक

**। रसायनी । वार्ताहर ।**

चौक तुपगावातील योगेश गुरव यांच्या शेतात ठेवलेल्या पेंढ्याचे जवळपास दोन हजार भारे अज्ञात व्यक्तींनी जाणीवपूर्वक जाळल्याची घटना घडली. तुपगावातील शंकर मंदिरानजीक गुरव यांनी शेतात पेंढा ठेवला होता. पंधरा गुरांसाठी वैरण म्हणून पेंढ्याची बेगमी गुरव कुटुंबाने केली होती. सायंकाळच्या सुमारास अज्ञात व्यक्तींनी पेंढा पेटवून दिला. गुरव यांनी शेताकडे धाव घेईपर्यंत सर्व पेंढा आगीच्या भक्ष्यस्थानी पडला होता. दुभती, गाभण जनावरे गोठ्यात असून, त्यांच्या चाऱ्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. याबाबत गुरव यांनी तलाठी यांना संपर्क करून नुकसान भरपाईसाठी पंचनामा करण्याची मागणी केली आहे.



## तीन कोरोनाग्रस्त

**। माणगाव । वार्ताहर ।**

माणगाव तालुक्यात ९ फेब्रुवारी रोजी तीन नवे कोरोनाग्रस्त रुग्ण आढळले असून, पाच रुग्ण बरे झाले आहेत. सध्या तालुक्यात २० रुग्ण कोरोनाबाधित असल्याची माहिती यावेळी जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

# कला साहित्य संमेलनाचे आयोजन

**। रसायनी । वार्ताहर ।**

जय मल्हार सामाजिक चॅरिटेबल ट्रस्ट, महाराष्ट्र आणि शिवांगी नृत्यमल्हार कला अकादमी देवरुख, रत्नागिरी यांच्या संयुक्त विद्यमाने ६ मार्च रोजी राष्ट्रीय शिव मल्हार कला, साहित्य संमेलन रत्नागिरीत आयोजित करण्यात आले आहे. आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त प्रतिभावान आणि यश कीर्तीच्या पूर्ततेच्या कृतार्थतेची ऐतिहासिक नोंद घेण्याच्या दृष्टीने कृतिशील गुणवत्तेचा सर्वश्रेष्ठ सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला आहे. रत्नागिरी येथे ६ मार्च २०२२ रोजी सकाळी ११ वाजता प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम होणार आहे.


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन



१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


## ग्रामपंचायत नवेदर नवगांव

जा.क्र. ११०४/२०२२ — **जाहिरात निविदा** — दि.९/२/२०२२

ग्रामपंचायत नवेदर नवगांव, ता.अलिबाग, जि.रायगड यांजकडून पंधराव्या वित्त आयोगाच्या अंतर्गत खालील विकासकामांच्या आणि साहित्यांच्या पुरवठा कामाच्या जाहीर निविदा/दरपत्रक मागविण्यांत येत आहेत. पंधराव्या वित्त योजने अंतर्गत विकास कामांच्या सिलबंद निविदा दिनांक ११/०२/२०२२ ते १७/०२/२०२२ रोजी दुपारी १:०० वाजेपर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) ग्रामपंचायत कार्यालयात समक्ष अगर टपालाने मोहोरबंद स्वरूपात पोहचतील अशा पाठवाव्यात उशीरा आलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रक रक्कम | इसारा रक्कम | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|
| १ | नवीन गावठाण शौचालय दुरूस्ती करणे | १०००००/- | १०००/- | ६ महिने |
| २ | मागासवर्गीय वस्तीमधील रस्ता कॉंक्रीट करणे | २६४५६२/- | २६४५/- | ६ महिने |
| ३ | नवगांव ग्रा.पं.अंतर्गत रस्ता तयार करणे | २६५२०६/- | २६५२/- | ६ महिने |
| ४ | ई लर्निंग उपक्रम | ६००००/- | | |
| ५ | अंगणवाडी अ डिजिटल करणे | ६००००/- | | |

**अटी व शर्ती**
१) सदर कामाचे अंदाजपत्रक व आराखडे कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.
२)नोंदणीकृत ठेकेदार/संस्था यांना प्राधान्य देण्यांत येईल.
३) विकास कामे निविदा फॉर्म ग्रामपंचायत कार्यालयामध्ये सुट्टीचे दिवस वगळून दिले जातील. सदर निविदा फॉर्म ची फी २००/- रू.इतकी राहिल.
४) प्रत्येक कामाच्या देयकातून शासकीय कपाती केल्या जातील.
५)कोणत्याही नामंजूर निविदा संदर्भात संबंधित ठेकेदारास कुठलाही पत्रव्यवहार केला जाणार नाही.
६)कोणतेही एक अथवा अनेक निविदा/दरपत्रके कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार मा.प्रशासक ग्रामपंचायत नवेदर नवगांव यांनी राखून ठेवला आहे.
७)विकास कामाचे देयक उपलब्ध निधीनुसार ठेकेदारास अदा करण्यांत येईल याची नोंद घ्यावी.
८) अंदाजपत्रकीय रक्कमेच्या १% इसारा रक्कम धनादेश अथवा रोख स्वरूपात भरणा करावी लागेल.
९) ग्रामपंचायत कार्यालयात प्राप्त झालेली निविदा दि.१७/०२/२०२२ रोजी दुपारी २:०० वाजता ग्रामपंचायत कार्यालयात मा.प्रशासक यांच्या समोर उघडण्यात येईल.

सही/- **ग्रामसेवक, ग्रामपंचायत नवेदर नवगांव, ता.अलिबाग, जि.रायगड**
सही/- **प्रशासक, ग्रामपंचायत नवेदर नवगांव, ता.अलिबाग, जि.रायगड**

## कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकार चा उपक्रम)

**खुली ई-निविदा मागविणारी सूचना** **दिनांकः०९.०२.२०२२**

कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड यांच्या वतीने क्षेत्रीय रेल्वे प्रबंधक, रत्नागिरी, पुढील कामाकरिता खुली ई-निविदा मागवित आहेतः- **कामाचे नावः** रत्नागिरी विभागातील टनलच्या आतील वॉटर सीपेजचे डायव्हर्जन करणे. **निविदा क्र.:** केआर-आरएन-डब्ल्यू-२०२२-०२. **अंदाजित खर्चः** रु. ५,०८,९८०/-. **ईएमडीः** रु. १०,२००/-. **ऑनलाईन निविदा जमा करण्याची शेवटची तारीख आणि वेळः** ०२.०३.२०२२ रोजी १५:०० वाजे पर्यंत. अधिक माहितीसाठी, कृपया क्षेत्रीय रेल्वे प्रबंधक यांचे कार्यालय, एमआईडीसी एरीया, मिरजोळे, रत्नागिरी येथे संपर्क साधावा. (वेबसाईटः **www.ireps.gov.in**)

## कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकार चा उपक्रम)

**सूचना**

याद्वारे जनतेला सूचना देण्यात येत आहे की कोंकण रेल्वेच्या रत्नागिरी विभागातील जिल्हा रायगडच्या **इंदापूर येथे कोलाड आणि माणगांव स्थानकांदरम्यान नवीन क्रॉसिंग स्टेशनच्या तरतूदीच्या संदर्भात रेल्वे किमी २४/१४२ येथील मुठवाली रोड वरील लेव्हल क्रॉसिंग गेट क्र. १० हे आवश्यक रस्ता वळवून किमी २४/३८७ येथे स्थलांतरित करण्यात आले. तरी कृपया ह्या रस्त्याचा/क्रॉसिंगचा वापर करणाऱ्या नागरीकांनी ह्याची नोंद घ्यावी.**

## ग्रामपंचायत नवेदर नवगांव

जा.क्र. ११०३/२०२२ — **जाहीर प्रगटन** — दि.९/२/२०२२

**महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी (शुल्क) नियम १९६०**

ग्रामपंचायत नवेदर नवगांव, ता.अलिबाग, जि.रायगड येथील सर्व नागरीकांना कळविण्यांत येते की, ग्रा. पं.कार्यालयाकडे प्राप्त झालेल्या अर्ज, अॅफेडेवीट व मृत्यू दाखल्यावरून खालील रकान्यातील असेसमेंट रजिस्टरवरील मालमत्ता फेरफार करण्याचे ठरले आहे.

| अ. क्र. | गाव | घर | लांबी X रूंदी | मालमत्तेचे वर्णन | सद्यस्थितीत असेसमेंटवरील नाव | फेरफार व्यक्तीचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | नवेदर नवगांव | ५५९ | २९.९ X २६.८ गावठाण मिळकत ५० X ३३ | पक्के सिमेंटपत्रे घर | तुकाराम गोपाल हामणे | १)श्रीमती.सुजाता तुकाराम हामणे २)सौ.सुहासिनी ब्रिजेश मठू |

वरील असेसमेंट फेरफार नोंदीबाबत कोणाला आक्षेप/तक्रार असेल तर हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झालेल्या तारखेपासून (७) दिवसांच्या आत ग्रा.पं.कार्यालयात आपल्या मालकी पुराव्यासह लेखी हरकत घ्यावी. मुदतीनंतर काही तक्रार आल्यास अशा तक्रारी अर्जाचा विचार केला जाणार नाही यांची नोंद घ्यावी.

सही/- **ग्रामसेवक, ग्रामपंचायत नवेदर नवगांव, ता.अलिबाग, जि.रायगड**
सही/- **प्रशासक, ग्रामपंचायत नवेदर नवगांव, ता.अलिबाग, जि.रायगड**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी खालील वर्णनाच्या मिळकती मिळकतीच्या विद्यमान मालकांकडुन सर्व हक्कांगासह विकत घेण्याच्या ठरविलेल्या आहेत.

**मिळकतींचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पैसे.) | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| परहुर, ता. अलिबाग | १४५/१ | ०-८९-५० पो.ख. ०-०६-३० एकूण ०-९५-८० पैकी क्षेत्र ०-१५-३० | १८.०५ | अशोक दत्तात्रेय पाटील मु. परहुर, पो. कामार्ले, ता.अलिबाग, जि. रायगड |
| | १४५/२ | ०-१९-०० पो.ख. ०-०३-०० एकूण ०-२२-०० | ०.२७ | |
| | १४५/४ | एकूण ०-०२-०० | ०.०५ | |
| | १४५/५ | ०-४३-०० पो.ख. ०-०२-०० एकूण ०-४५-०० | ०.९१ | |

वर नमुद मिळकतींचा साठेकरार मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांच्या लाभात स्वाक्षरीत करून दिलेला आहे. सदरहू मिळकती निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकती निर्वेध आहेत, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : १०/०२/२०२२

**(अॅड. संजय द. म्हात्रे)**
सितास्मुती, आगरसुरे, पो.चोंढी
ता.अलिबाग जि.रायगड.

## जाहीर नोटीस

प्रो. जमा रु. ५०/-

अर्जदारतर्फे अॅड. पल्लवी तुळपुळे

अलिबाग येथील मा. मुख्य नायदंडाधिकारी सो. रायगड याचे न्यायालयात
क्रि.चौ.अर्ज नं. ३/२०२०

स्वप्नाली संतोष नाईक --- अर्जदार
विरुद्ध
ग्रुप ग्रामपंचायत नागांव ... सामनेवाला

या जाहीर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की,

अर्जदार यांनी त्यांचे पणजोबा कै.काशिनाथ नारायण पाटील हिचा मृत्यू दिनांक १९-०३-१९९५ रोजी मौजे-बागमळा, ता.अलिबाग, जि.रायगड येथे झालेला आहे व त्याची नोंद ग्रुप ग्रामपंचायत नागांव यांच्या कार्यालयीन दप्तरी दि. १९-०३-१९९५ साली नोंदविण्याचे अनवधानाने व नजरचुकीने राहून गेलेले आहे. सदर मृत्यूची नोंद होण्याकरिता आदेश मिळविण्याकरिता मे.कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे. तरी सदर आदेश देण्यास कोणाचीही तक्रार असल्यास त्यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दि. २३-०२-२०२२ रोजी पर्यंत मे.न्यायालयात हजर राहून आपली तक्रार नोंदवावी. मागाहून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक ९-२-२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/- स. अधिक्षक, मुख्य न्यायदंडाधिकारी कोर्ट, अलिबाग- रायगड**
कोर्टाचा शिक्का
**सही/- स. अधिक्षक, मुख्य न्यायदंडाधिकारी कोर्ट, अलिबाग- रायगड**

## जाहीर नोटीस

प्रो. जमा रु. ५०/-

अर्जदारतर्फे अॅड. पल्लवी तुळपुळे

**अलिबाग येथील मा. मुख्य नायदंडाधिकारी सो.रायगड याचे न्यायालयात**
क्रि.चौ.अर्ज नं. १/२०२०

स्वप्नाली संतोष नाईक --- अर्जदार
विरुद्ध
ग्रुप ग्रामपंचायत नागांव ... सामनेवाला

या जाहीर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की,

अर्जदार यांनी त्यांची पणजी कै. चंद्रभागा काशिनाथ पाटील हिचा मृत्यू दिनांक १७-०१-२००४ रोजी मौजे-बागमळा, ता.अलिबाग, जि.रायगड येथे झालेला आहे व त्याची नोंद ग्रुप ग्रामपंचायत नागांव यांच्या कार्यालयीन दप्तरी दि. १७-०१-२००४ साली नोंदविण्याचे अनवधानाने व नजरचुकीने राहून गेलेले आहे. सदर मृत्यूची नोंद होण्याकरिता आदेश मिळविण्याकरिता मे.कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे. तरी सदर आदेश देण्यास कोणाचीही तक्रार असल्यास त्यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दि.२३-०२-२०२२ रोजी पर्यंत मे.न्यायालयात हजर राहून आपली तक्रार नोंदवावी. मागाहून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक ९-२-२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/- स. अधिक्षक, मुख्य न्यायदंडाधिकारी कोर्ट, अलिबाग- रायगड**
कोर्टाचा शिक्का
**सही/- स. अधिक्षक, मुख्य न्यायदंडाधिकारी कोर्ट, अलिबाग- रायगड**

## जाहीर नोटीस

प्रो. जमा रु. ५०/-

अर्जदारतर्फे अॅड. पल्लवी तुळपुळे

अलिबाग येथील मा. मुख्य नायदंडाधिकारी सो. रायगड याचे न्यायालयात
क्रि.चौ.अर्ज नं. २/२०२०

स्वप्नाली संतोष नाईक --- अर्जदार
विरुद्ध
ग्रुप ग्रामपंचायत नागांव ... सामनेवाला

या जाहीर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की,

अर्जदार यांनी त्यांची आजी कै.सुलोचना वामन पाटील यांचा मृत्यू दि. ०५-०४-२००५ रोजी मौजे-बागमळा, ता.अलिबाग, जि.रायगड येथे झालेला आहे व त्याची नोंद ग्रुप ग्रामपंचायत नागांव यांच्या कार्यालयीन दप्तरी दि. ०५-०४-२००५ साली नोंदविण्याचे अनवधानाने व नजरचुकीने राहून गेलेले आहे. सदर मृत्यूची नोंद होण्याकरिता आदेश मिळविण्याकरिता मे. कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे. तरी सदर आदेश देण्यास कोणाचीही तक्रार असल्यास त्यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दि. २३-०२-२०२२ रोजी पर्यंत मे.न्यायालयात हजर राहून आपली तक्रार नोंदवावी. मागाहून आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक ९-२-२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/- स. अधिक्षक, मुख्य न्यायदंडाधिकारी कोर्ट, अलिबाग- रायगड**
कोर्टाचा शिक्का
**सही/- स.अधिक्षक, मुख्य न्यायदंडाधिकारी कोर्ट, अलिबाग- रायगड**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत त्यांच्या मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे-किकवी, तालुका-कर्जत, जि.रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्वे नं | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| १)अब्बा याकुब बालुवाला २)मिकाईल यूनूस बालुवाला ३)असगरी फखरूद्दीन जीमवाला | २० | ४/क | १-६३-०० | ०-४८ |

वर वर्णन केलेली जमिन मिळकतीच्या कोणत्याही व्यक्तींचा अगर संस्थचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास आणि किंवा कोणत्याही व्यक्तींची अगर संस्थांची आमच्या अशिलांच्या वर वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७(सात) दिवसांत पुराव्यासोबत लेखी स्वरूपात हरकत कळवावी, वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील जमिन मिळकतीशी कोणत्याही व्यक्तींचा अगर संस्थांचा कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही, तसेच कोणत्याही व्यक्तींचा अगर संस्थांची आमचे अशिलांच्या वर वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत नाही किंवा असल्यास ती हरकत त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेली आहे असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणीही हरकत घेतल्यास ती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि.०८/०२/२०२२

अधिवक्ता
**शैलेश दत्तात्रेय पवार**
पत्ता.घर क्र.३, नेमीनाथ हाईट्स शेजारी,
मुद्रे बु.कर्जत, ता.कर्जत, जि.रायगड
मो.९५९५२११८६७

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे असे कळविणेत येते की, आमचे अशिलांनी श्री. बेरोज शेरियार झारोपस्ती मनाज व सौ. गावेर बेरोज झारोपस्ती मनाज यांचे मालकीच्या मौजे आवास ता.अलिबाग, जि.रायगड येथील भूमापन क्र.२२१ (जुना नं.३६७) एकूण क्षेत्र १-७४-३० (हे.आर.) आकार १०.१९ (रु.पैसे), पैकी विद्यमान घराच्या मागील बाजूकडील १-२०-०० (हे.आर.) एवढ्या क्षेत्राची मिळकत आमचे अशिलांनी कायमस्वरुपी विकत घेणेचे ठरविले आहे. सदर मिळकत विद्यमान मालकांनी निर्वेध असल्याची खात्रीही दिली आहे. तसेच विद्यमान मालकांनी व आमचे अशिलांनी निर्वेध मालकी हक्काच्या दाखल्याची मागणीही केली आहे. तरी सर्व लोकांस या नोटीशीने असे कळविण्यात येते की, वर नमूद केलेल्या मिळकतीत, वर नमूद विद्यमान मालकांव्यतिरिक्त अन्य कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, लीज, लीन, वहिवाट वगैरे कोणताही कसलाही हक्क हितसंबंध असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ (पंधरा) दिवसांचे आत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह, लेखी स्वरुपात आपल्या हरकती खाली सही करणार यांचेकडे आणून द्याव्यात. सदर विहित मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत खाली सही करणार यांचेकडे न आल्यास, निर्वेध मालकी हक्काचा दाखला दिला जाईल व आमचे अशिल सदर मिळकत ही निर्वेध आहे असे समजून विद्यमान मालकांबरोबर खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मग मागाहून येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाही, याची सर्वांनी स्पष्ट नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

अलिबाग,
**तारीख : ११-०२-२०२२**

**(अॅड. सुरेंद्र नारायण जोशी)**
**अे-१०१/१११, त्रिमूर्ती प्लाझा,बीचरोड, अलिबाग, जिल्हा रायगड**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे असे कळविणेत येते की, आमचे अशिलांनी मे.एलन ट्रेडींग अँड मर्कनटायजिंग प्रा.लिमिटेड यांचे मालकीच्या मौजे अलिबाग ता. अलिबाग, जि. रायगड येथील अलिबाग नगरपरिषद हद्दीतील सिटी सर्वे नं. ६४२, ६४२/२, ६४२/३अे,६४२/३बी, ६४२/१, के६४२/३ आणि सर्वे नं. १६८/१६अे, १६८/१६ बी एकूण क्षेत्र ४७४.६० चौ.मी. व त्यामधील नगरपालिका घर नं. ११३४ या तळ अधिक दोन मजलेची इमारत व त्यामधील सर्व फर्निचर, काऊंटर्स, सोलर सिस्टिम, जनरेटर वगैरे अशी हॉटेल द्वारका व चंद्रमा लॉज नावाची मिळकत कायमस्वरुपी विकत घेणेचे ठरविले आहे. सदर संपूर्ण मिळकत विद्यमान मालकांनी निर्वेध असल्याची खात्रीही दिली आहे. तसेच विद्यमान मालकांनी व आमचे अशिलांनी निर्वेध मालकी हक्काच्या दाखल्याची मागणीही केली आहे. सदर संपूर्ण मिळकत ही आजहिमतीस आयडीबीआय बँकेकडे गहाण आहे. तरी सर्व लोकांस या नोटीशीने असे कळविण्यात येते की, वर नमूद केलेल्या मिळकतीत, वर नमूद विद्यमान मालकांव्यतिरिक्त व आयडीबीआय बँके व्यतिरिक्त अन्य कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, लीज, लीन, वहिवाट वगैरे कोणताही कसलाही हक्क हितसंबंध असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ (पंधरा) दिवसांचे आत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह, लेखी स्वरुपात आपल्या हरकती खाली सही करणार यांचेकडे आणून द्याव्यात. सदर विहित मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत खाली सही करणार यांचेकडे न आल्यास, निर्वेध मालकी हक्काचा दाखला दिला जाईल व आयडीबीआय बँकेचा गहाणाचा बोजा उतरवून आमचे अशिल सदर मिळकत ही निर्वेध आहे असे समजून विद्यमान मालकांबरोबर खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मग मागाहून येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाही, याची सर्वांनी स्पष्ट नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

अलिबाग,
**तारीख : ११-०२-२०२२**

**(अॅड. सुरेंद्र नारायण जोशी)**
**अे-१०१/१११, त्रिमूर्ती प्लाझा,बीचरोड, अलिबाग, जिल्हा रायगड**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,
आमच्या अशिलांनी मौजे बोरघर, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालक आदेश अशोक खोत यांच्याकडून विकत घेण्याचे निश्चित केले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे बोरघर, ता. अलिबाग, जि. रायगड**

| मौजे | गट नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| बोरघर ता.अलिबाग | ३१६ | एकूण ०-३४-०० | ०.४४ |

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकत विकत घेण्याचा व्यवहार खरेदीखत करुन पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दिनांक : १०/०२/२०२२

**अॅड. प्रियांका किशोर बिर्जे**
बी.एल.एस.एल.एल.बी.
जिल्हा न्यायालय अलिबाग-रायगड
पत्ता : मु.पो. कुरुळ, ता. अलिबाग-रायगड
मो. नं. ८३७९९३७८७०

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी खालील वर्णन केलेली भातशेती मिळकत असून त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्रीमती भारती बाळाराम धुमाळ व २)श्री योगेश बाळाराम धुमाळ मु. नवेनगर, पो. पोयनाड, ता. अलिबाग, जि. रायगड व तसा साठेकरार दि. ८/१०/२०२१ रोजी विद्यमान मालकांनी आमचे अशिलास लिहून दिलेला आहे. यांच्याकडून कायम विकत घेणेबाबत व्यवहार ठरविलेला आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरुन आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| पोयनाड ता. अलिबाग | १३७/१ | ०-२७-० पो.ख. ०-०३-० ०-३०-०० | ०-५३ |

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध बोजा, अथवा गहाण, दान, लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेटेनन्स मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (७) सात दिवसांचे आत आणून द्यावी. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतला जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यात येईल, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दि. १०-०२-२०२२

सही/-
**अॅड. आर.बी. कोसमकर**
चिरायु, ब्राह्मणआळी, अलिबाग
ता. अलिबाग, जि. रायगड

# ग्रुप ग्रामपंचायत आरेबुद्रूक, ता. रोहा

दिनांक :- १०-०२-२०२२

## निविदा सूचना

ग्रुप ग्रामपंचायत आरेबुद्रूक हद्दीतील खालील विकास कामे जनसुविधा अंतर्गत ग्रामपंचायत स्तर निधीतून हाती घेतले आहे. सदर कामास ग्रामपंचायत मासिक सभा व ग्रामसभेने प्रशासकीय मान्यता दिली असून अंदाजपत्रकात मा. कार्यकारी अभियंता (बांधकाम) रायगड जिल्हा परिषद अलिबाग, यांनी तांत्रिक मंजुरी दिली असून सदर काम करणेसाठी नोंदणीकृत निविदा मागवण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | ठेकेदाराचा वर्ग | कामपूर्ण करणेचा कालावधी | निविदा सादर करणेची | | | १% घसारा रक्कम | ५% प्रतिभूती रक्कम | कोरे निविदा फॉर्म फी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | अंतिम दिनांक | वेळ | ठिकाण | | | |
| १ | ग्रा.पं. आरेबुद्रूक मौजे आरेबुद्रूक येथे गणपती विसर्जन घाट व शेड बांधणे ता. रोहा | ६०००००/- | अधिकृत | तीन महिने | १७-०२-२०२२ | ४.०० | ग्रा.प. कार्यालय | ६०००/- | ३००००/- | २००/- |

१. कामाचे अंदाजपत्रक व आराखडे कार्यालयीन वेळेस पहावयास मिळतील. आवश्यक असलेली फी भरुन त्याची प्रत उपलब्ध केले जातील.
२. प्राप्त निविदा दिनांक १८-०२-२०२२ रोजी संध्या ४.०० वाजता ग्रामपंचायत कार्यालयीत उपस्थितांचे सक्षम मा. सरपंच यांचे उघडण्यात येतील .
३. निविदा भरणाऱ्या ठेकेदारांनी आपल्या रजिस्ट्रेशन दाखले हे सत्यप्रत केलेले असावे.
४. कोणताही एक अथवा अनेक निविदा कोणतीही कारण न देता नाकारण्याचा अधिकार सरपंच यांनी ठेवलेला आहे.
५. देयकातून शासन नियमाप्रमाणे आयकर व उपकाराची कपात केली जाईल. पंचायत समिती रोहा यांचेकडील तांत्रिक अधिकारी व ग्रामपंचायतीने अधिकारी सदस्य यांचे मार्गदर्शन व यांच्या देखरेखीखालील सदर काम करणे असून काम समाधानकारक नसेल तर ते त्याच स्थितीत थांबून कार्यारंभ आदेश रद्द करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.
६. काम अंतिमरित्या पूर्ण झाल्यानंतर सहा महिन्यापर्यंत देखभाल दुरुस्ती संबंधित ठेकेदार यांनी करणेची असून त्यानंतर सुरक्षा अनामत परत केली जाईल.
७. उपलब्ध निधीप्रमाणे रक्कम अदा केली जाईल.
८. निविदा पोस्टाने पाठविली जाणार नाही व दिलेल्या तारीख व वेळेपेक्षा उशीरा आलेली निविदा स्वीकारली जाणार नाही.
९. निविदा किंमत ना परतावा समजावी.
१०. निविदा मंजूर केल्यास ५००/- रु.स्टॅम्प पेपरवर करारनामा स्व:खर्चाने करुन घ्यावा लागेल.

सही/- **ग्रामसेवक, ग्रुप ग्रामपंचायत आरेबुद्रूक, ता. रोहा, जि. रायगड**
सही/- **सरपंच, ग्रुप ग्रामपंचायत आरेबुद्रूक, ता. रोहा, जि. रायगड**

## म ह त्त्वा चे

### शूटिंगबॉल स्पर्धेचे आयोजन

। खारेपाट । वार्ताहर ।

अलिबाग तालुक्यातील विद्युत क्रीडा मंडळ मांडवखार आयोजित राज्यस्तरीय शुटींगबॉल स्पर्धेचे आयोजन रविवारी (दि.१३) आयोजन केले आहे. अध्यक्ष शंकर मोकल यांच्या अध्यक्षततेखाली रायगड जिल्ह्यासह महाराष्ट्रचे नामावंत संघ सहभागी होणार आहेत. त्या अनुषघांने संघ नायक, खेळाडू व क्रिडा रसिक प्रेक्षकांनी सदर स्पर्धेचा लाभ घ्यावा. सदर संघ गेली अनेक वर्ष सातत्याने स्पर्धा भरवित आहे. स्पर्धेकरिता प्रथम क्रमांकाचे पारितोषिक १५ हजार रुपये उद्योजक अमित नाईक यांनी दिले आहे. दुसरे पारितोषिक ११ हजार रुपये ग्रामस्थ मंडळ मांडवखार यांनी तर तृतीय क्रमांकाचे पारितोषिक ७ हजार रुपये अजित मोकल यांनी तसेच चतुर्थ क्रमांकाचे पारितोषिक ७ हजार रमेश पाटील यांनी दिले आहे. तसेच ५ ते ८ क्रमांक पर्यंत पारितोषिक देण्यात येणार आहेत. तसेच शुटींग बॉल स्पर्धेकरिता क्रमांक १ ते ८ क्रमांकापर्यंत चषक मल्हार मोकल यांच्याकडून देण्यात येणार आहे व उत्कृष्ट नेटमन, डिफेन्स आणि मालिकावीर यांना चषक रत्नेश मोकल यांच्याकडून देण्यात येणार आहे

### कोल्हापूरमध्ये फुटबॉल स्पर्धा

। कोल्हापूर । वृत्तसंस्था ।

कोरोनामुळ स्थगित करण्यात आलेल्या फुटबॉल स्पर्धेला कोल्हापूर जिल्हा प्रशासन आणि महानगरपालिकेने अखेर परवानगी दिली असून तब्बल ७०० दिवसांनी फुटबॉल स्पर्धेचा अंतिम सामना होणार आहे. फुटबॉल इतिहासात ही पहिलीच घटना आहे. कोल्हापूर महानगरपालिकेच्यावतीने ४ ते १५ मार्च या कालावधीत भव्य प्रमाणात महापौर चषक फुटबॉल स्पर्धेचे आयोजन केले होते. परंतु कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर जारी केलेल्या बंदी आदेशामुळे महापौर चषक फुटबॉल स्पर्धा स्थगित करण्यात आली होती. त्यानंतर ७०० दिवसांनी पुन्हा ही स्पर्धा खेळविली जाणार आहे.



धाक्सुद चिल्हे कबड्डी स्पर्धेत

# जय बजरंग आंबेवाडी संघ विजेता

। गोवे-कोलाड । वार्ताहर ।

रोहा तालुक्यातील चिल्हे येथे धाक्सुद मंडळ चिल्हे आयोजित कोलाड विभागीय कबड्डी स्पर्धेत जय बजरंग आंबेवाडी संघ अंतिम विजेता ठरला आहे.

रोहा तालुक्यातील धाक्सुद चिल्हे युवक मंडळांनी आयोजित केलेल्या कोलाड विभागीय कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने व ग्रामस्थ नागरिक यांच्या विशेष सहकार्यातून आयोजित केलेल्या कबड्डी स्पर्धेत अंतिम फेरीची अटीतटीची लढत जय बजरंग आंबेवाडी व गावदेवी बाहे यांच्यात अतिशय रंगदार झाली. या लढतीत अखेर अंतिम विजयी म्हणून जय बजरंग आंबेवाडी संघ ठरला तर द्वितीय क्रमांकावर गावदेवी बाहे संघाला समाधान मानावे लागले .

या कबड्डी खेळाचा शुभारंभ कोलाड, खांब, देवकान्हे विभागातील गोवे सरपंच महेंद्र पोटफोडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आंबेवाडी जि.प. गणाचे अध्यक्ष नरेंद्र जाधव, खांब विभाग शेकाप ज्येष्ठ नेते मारुती खांडेकर, नारायण महाराज महाडिक, विनायक महाडिक, ठमाजी महाडिक, सहदेव महाडिक, अनिल महाडिक, रायगड भूषण डॉ श्यामभाऊ लोखंडे, मंगेश लोखंडे, गाव कमिटी अध्यक्ष सुधीर लोखंडे, रवींद्र लोखंडे, पोलीस पाटील गणेश महाडिक, आदर्श शिक्षक नंदकुमार मरवडे, असोसिएशनचे अध्यक्ष महेश ठाकूर, तुकाराम महाडिक आदी मान्यवर उपस्थित होते. स्पर्धेत अंतिम विजेता आंबेवाडी संघ तर उपविजेता बाहे संघ तसेच तृतीय क्रमांकचे मानकरी सापया वरसगाव व चतुर्थ क्रमांक धाक्सुद चिल्हे संघांनी पटकावले आहे. तर स्पर्धेतील मालिकावीर आंबेवाडी संघाचा अखिलेश गाडगे उत्कृष्ट चढाई बाहे संघाचा विजय माठल तर उत्कृष्ट पकड वरसगाव संघाचा नितेश सानप हे मानकरी ठरले असून विजय संघाना तसेच खेळाडूंना पारितोषिक व चषक देऊन गौरविण्यात आले.

या स्पर्धेला प्रेक्षकांचाही उदंड प्रतिसाद लाभला.



## चेंडू छेडछाड प्रकरणात रवी बोपाराला मोठा दंड

### संघाचेही झाले नुकसान

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

बांगलादेश प्रीमियर लीगमध्ये ७ फेब्रुवारीला सिलहट सनरायजर्सचा खुलना टायगर्स विरुद्ध सामना पार पडला. या सामन्यात इंग्लंड संघाचा अष्टपैलू रवी बोपाराला चेंडू छेडछाड प्रकरणात सामना फीच्या ७५ टक्के दंड ठोठावण्यात आला आहे. त्याच्या चुकीचा फटका सिलहट सनरायझर्सलाही बसला आहे. त्यांना विरोधी संघाला पाच धावा पेनल्टी म्हणून द्याव्या लागल्या. बांगलादेश क्रिकेट बोर्डाच्या हवाल्याने ही माहिती दिली आहे. खुलना टायगर्स विरुद्धच्या सामन्यात सिलहट सनरायझर्सचे नेतृत्व करणाऱ्या बोपाराच्या खात्यात तीन डिमेरिट्स गुणांची नोंद झाली आहे. सामन्याच्या ९ व्या षटकात घडलेला हा प्रकार आहे. कर्णधार बोपारा कॅमेरामध्ये गोलंदाजी करण्यापूर्वी चेंडूवर नखे लावताना दिसला आहे. सामना अधिकारी देबब्रत पाल यांनी बोपारावर सुरुवातीला तीन सामन्यांची बंदी घातली होती. अंतिम निर्णय बिपीएल स्पर्धेची तांत्रिक समिती म्हणजे एएसएम रोकीबुल हसन हे घेणार होते. बोपाराच्या अपीलानंतर तांत्रिक समितीने त्याला कमी शिक्षा देण्याचा निर्णय घेतला आहे.

या सामन्यामध्ये मैदानावरील पंच महफुजुर रहमान आणि प्रगीत रामबुकवेला यांना ही गोष्ट समजली, तेव्हा त्यांनी त्याच्याकडून चेंडू काढून घेतला. बोपारा आणि यष्टिरक्षक अनामूल हक या दोघांनी पंचांशी बोलण्याचा प्रयत्न केला, पण काही उपयोग झाला नाही. चेंडू छेडछाड करण्याचा प्रयत्न केल्यामुळे सिलहट सनरायझर्सला पाच धावांचा दंड ठोठावण्यात आला.

## माथेरानमध्ये डे-नाईट क्रिकेट स्पर्धा



। माथेरान । वार्ताहर ।

माथेरान मधील भव्य डे-नाईट टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा दि.१५ व १६ फेब्रुवारी रोजी येथील वीर हुतात्मा भाई कोतवाल क्रीडा संकुलात आयोजित करण्यात आल्या आहेत. या स्पर्धेचा प्री-लॉचिंग कार्यक्रम दि.१३ रोजी सायंकाळी साडेसात वाजता माउंट मैदानावर आयोजित करण्यात आला असून सेरेमनी विथ डिनरचे सुध्दा यावेळी आयोजन करण्यात आले आहे. या भव्य कार्यक्रमासाठी उत्तम आसन व्यवस्था करण्यात आली आहे. दोन दिवस ही स्पर्धा युट्यूब च्या माध्यमातून दाखवण्यात येणार आहे. या सामन्यात विजेत्या आणि उप विजेत्या संघांना रोख रक्कमेची बक्षिसे आणि ट्रॉफी देण्यात येणार आहेत.

## दीपिका पल्लीकलने केले पुनरागमन

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

भारताची उत्कृष्ट स्क्वॅशपटू दीपिका पल्लीकल हिने जुळ्यांना जन्म दिल्यानंतर चार वर्षानंतर कोर्टवर पाय ठेवला. क्रिकेटपटू दिनेश कार्तिकची पत्नी असलेली दीपिका मागच्या वर्षी आई बनली होती.

यंदा राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा आणि आशियाई स्पर्धेवर लक्ष केंदित करण्यासाठी दीपिकाचा मागील दोन महिन्यापासून सराव सुरू आहे. खेळापासून दूर असताना ३१ वर्षांच्या दीपिकाने इंटेरियर डिझायनर म्हणूनही काम केले. ती बर्मिंगहॅम राष्ट्रकुल स्पर्धेत दुहेरीत आणि त्यांनतर हाँगजोऊ येथे आशियाई स्पर्धेत एकेरीत खेळण्यावर भर देणार आहे. पद्मश्री आणि अर्जुन पुरस्काराची मानकरी दीपिका-ज्योत्स्ना चिनप्पा यांनी २०१४ च्या राष्ट्रकुल स्पर्धेत भारतासाठी पहिल्यांदा सुवर्ण पदक जिंकले होते.



सनरायझर्स हैदराबादची संघाने लॉन्च केली जर्सी

## सात वर्षांनी केला बदल

। मुंबई । वृत्तसंस्था ।

२०१६ आयपीएल विजेता संघ सनरायझर्स हैदराबाद संघाने आगामी हंगामासाठी त्यांनी आपली जर्सी प्रसिद्ध केली आहे.

जगातील सर्वात मोठी व्यवसायिक टी२० लीग असलेल्या इंडियन प्रीमियर लीगचा आगामी हंगाम (आयपीएल २०२२) मार्च महिन्याच्या अखेरीस सुरु होण्याची शक्यता आहे. तत्पूर्वी, खेळाडूंचा मेगा लिलाव १२ व १३ फेब्रुवारी रोजी बेंगलोर येथे आयोजित केला गेला आहे. या लिलावात सर्व संघ आपल्या संघाची बांधणी करतील. त्याचवेळी, आपल्या सोशल मीडिया हँडलवरून त्यांनी ही माहिती दिली.

आयपीएलच्या प्रमुख संघांपैकी एक असलेल्या सनरायझर्स हैदराबाद संघाने आयपीएल २०२२ साठी आपली अधिकृत जर्सी लॉन्च केली. तब्बल सहा वर्षानंतर त्यांनी आपल्या जर्सीमध्ये महत्त्वाचा बदल केला. ऑरेंज आर्मी या टोपण नावाने प्रसिद्ध असलेल्या सनरायझर्स हैदराबाद संघाने यावेळी आपल्या जर्सीमधून सोनेरी रंग पूर्णपणे हटविला आहे. यावेळी त्यांची जर्सी ही केशरी व काळ्या रंगाची असेल.



तर, ट्राऊजर पूर्णपणे केसरी रंगाचा दिला आहे. याबरोबर संघाच्या सपोर्ट स्टाफमध्ये देखील मोठा बदल झाला आहे. टॉम मूडी मुख्य प्रशिक्षकपदी कायम असून, मुथय्या मुरलीधरन देखील गोलंदाजी सल्लगाराच्या स्वरूपात संघाचा आणखी एक हंगाम भाग असेल. याव्यतिरिक्त ब्रायन लारा, डेल स्टेन व हेमांग बदानी बदानी संघाला यावेळी मार्गदर्शन करताना दिसून येतील.

## रेपो दराबाबत सोशल मीडियावर चर्चा

वर्षा मेहता

। अलिबाग ।



### हॅशटॅग रेपो रेट ट्रेंड

SOCIAL MEDIA पडसाद

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे (आरबीआय) गव्हर्नर शक्तीकांत दास यांच्या अध्यक्षतेखालील सहा सदस्यीय चलनविषयक धोरण समितीने (एमपीसी) रेपो दर ४ टक्क्यांवर अपरिवर्तित ठेवला, तर रिव्हर्स रेपो दर देखील कायम ठेवला ३.३५ टक्के वर. मार्जिनल स्टँडिंग फॅसिलिटी दर आणि बँक दर देखील ४.२५ टक्के वर अपरिवर्तित राहिले. मध्यवर्ती बँकेने २२ मे २०२० रोजी आपल्या पॉलिसी रेपो रेट किंवा अल्प-मुदतीच्या कर्ज दरात शेवटची सुधारणा केली होती. आरबीआयच्या निर्णयांवर दास म्हणाले की, भारत उर्वरित जगापेक्षा पुनर्प्राप्तीचा एक वेगळा मार्ग आखत आहे आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या अंदाजानुसार देश मोठ्या अर्थव्यवस्थांमध्ये वर्षानुवर्षे सर्वात वेगाने वाढण्यास तयार आहे. चलनवाढीबद्दल बोलताना, आरबीआय गव्हर्नर म्हणाले की चालू आर्थिक वर्ष २०२१-२२ साठी उझख महागाईचा अंदाज ५.३ टक्के राखून ठेवला आहे तर महागाई ४.५ टक्के राहण्याचा अंदाज आहे. उच्च महागाई आणि कमी रेपो रेट म्हणजे, मध्यमवर्गीय आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी आपत्ती.

## ...तर मी भारतासाठी खेळलो नसतो

### संघात जागा निर्माण करणे सोपे नाही; एबी डिव्हिलियर्सचे मोठे विधान

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

भारतीय क्रिकेट संघात एखाद्या खेळाडूला आपले स्थान निर्माण करण्यासाठी किती संघर्ष करावा लागतो हे काही नव्याने सांगण्याची गरज नाही. लोकसंख्येमध्ये दुसऱ्या क्रमांकावर असणाऱ्या देशात राष्ट्रीय संघात जागा मिळवणे खूप मोठे आव्हानच आहे. यामुळेच आपल्या देशातील अनेक तरुणांचे एक मोठा क्रिकेटर होण्याचे स्वप्न अनेकदा अपूर्णच राहते. याच पार्श्वभूमीवर दक्षिण अफ्रिकेचा माजी खेळाडू एबी डिव्हिलियर्सने एक विधान केले आहे.

डिव्हिलियर्सने इंडियन प्रीमियर लीगमधील संघ रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुच्या पॉडकास्टमध्ये बोलताना हे वक्तव्य केले आहे.



यावेळी डिव्हिलियर्सने जर आपला जन्म भारतात झाला असता तर कदाचित राष्ट्रीय संघात जागा मिळवू शकलो नसतो असे म्हटले आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळणे माझे स्वप्नच राहिले असते असे डिव्हिलियर्स म्हणतो. भारतीय संघात आपली जागा निर्माण करणे सोपी गोष्ट नसून यासाठी भारतीय खेळाडूंचा आदर केला पाहिजे असेही मत मांडले.

## सलामीवीर पंतबाबत रोहितचा खुलासा

। अहमदाबाद । वृत्तसंस्था ।

रोहित शर्माने दुसऱ्या वनडे सामन्यात काही बदल करत सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला होता. रोहित शर्माने केएल राहुल सोबत सलामीला येणाऐवजी ऋषभ पंत सोबत सलामी दिली. त्यावर रोहित म्हणाला की, ममला काही वगेळ्या गोष्टी करण्यास सांगितले होते. ही वेगळीच गोष्ट होती. ऋषभ पंतने सलामी देणे लोकांना आवडले असेल. पण हो हे कायमस्वरूपी नाही. आम्ही कोणती कॉम्बिनेशन चालू शकतील याची पडताळणी करत आहोत.

## इंडिजला मिळणार व्हाईट वॉश?

। मुंबई । वृत्तसंस्था ।

वेस्ट इंडिज विरूद्धच्या वन-डे सीरिजमधील तिसरी आणि शेवटची वन-डे शुक्रवारी होणार आहे. ही वन-डे जिंकत वेस्ट इंडिजला व्हाईट वॉश देण्याची संधी भारताला आहे. या सीरिजमधील पहिल्या वन-डेपूर्वी शिखर धवनसह ४ भारतीय खेळाडू कोरोना पॉझिटिव्ह आढळले होते. आता यापैकी धवन संपूर्ण फिट झाला असून, तो टीममध्ये परतल्यास सलग तिसऱ्या मॅचमध्ये टीम इंडियात बदल होणार आहे. या सीरिजमधील पहिल्या मॅचमध्ये इशान किशनने तर दुसऱ्या मॅचमध्ये ऋषभ पंतने रोहित शर्मासोबत ओपनिंग केली होती. आता तिसऱ्या वन-डेमध्ये रोहित-शिखर ही अनुभवी जोडी ओपनिंगला येण्याची दाट शक्यता आहे.






कृषीवल

## क्रीडा संघटनांना आवाहन

रायगड जिल्ह्यात विविध क्रीडा स्पर्धा आयोजित केल्या जात आहेत. त्यामुळे क्रीडाक्षेत्रात नैपुण्य मिळविण्याची संधी खेळाडूंना मिळत आहे. त्यामधून क्रीडापटू तयार व्हावेत आणि त्यांना यथायोग्य प्रसिद्धी लाभावी यासाठी कृषीवलतर्फे सर्वच क्रीडा स्पर्धांच्या आयोजनाची तसेच स्पर्धा झाल्यानंतरचे वृत्त कृषीवलमध्ये विनामुल्य प्रसिद्ध केले जाणार आहे. यासाठी सर्व क्रीडा संघटना,आयोजकांना आवाहन करण्यात येते की त्यांनी आयोजित केल्या जाणाऱ्या स्पर्धांची सविस्तर माहिती, स्पर्धे चे उद्घाटन,स्पर्धेचे बक्षिस वितरण आदींची माहिती कृषीवलकडे krushivalnews@gmail.com या मेलवर पाठवावी.त्यास तातडीने प्रसिद्धी दिली जाईल.

**स्पर्धेसाठी माध्यम प्रायोजकबाबत कृषीवल कार्यालयाशी संपर्क साधावा.**

\- मुख्य संपादक





## भगवद्गीता स्पर्धा

हजारो वर्षांची परंपरा लाभलेल्या भगवद्गीतेचे महत्त्व भावी पिढीलाही ज्ञात व्हावे, हा उदात्त दृष्टिकोन समोर ठेवून इस्कॉन 'हरे कृष्ण' नामहट, अलिबाग केंद्रातर्फे विद्यार्थी तसेच खुल्या गटासाठी भगवद्गीता पाठांतर स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. ही स्पर्धा विनामूल्य असून, विजयी होणाऱ्यांना रोख बक्षिसेही दिली जाणार आहेत.

विद्यार्थी गट- ५ वी ते १० वी,
खुला गट- ११ वी ते पुढे (मुला/मुलींसाठी)
दैनिक कृषीवलमध्ये दररोज छापून येणाऱ्या भगवद्गीतेतील प्रत्येक अध्यायानंतर १० प्रश्न विचारले जातील. त्याची उत्तरे दोन्ही गटांनी द्यायची आहेत. प्रत्येक गटासाठी पुढीलप्रमाणे बक्षिसे दिली जातील.
*(प्रथम क्रमांक ५ हजार रुपये, द्वितीय ३ हजार रुपये, तृतीय २ हजार रुपये, उत्तेजनार्थ १ हजार रुपये)*
अधिक माहितीसाठी तसेच प्रश्नाची उत्तरे सादर करण्यासाठी खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

**श्री. गुरुनाथ बळीराम नाईक, पत्ता- संत रोहिदास नगर, 'वृंदावन' घर क्र. ७२, चेंढरे कावेरी बिल्डींग समोर ९४२३०९१०८१**
**पाठांतर केलेले श्लोक सादर करण्याची वेळ व ठिकाण वेळोवेळी जाहीर केले जाईल.**

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ. चित्रलेखा पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ MH/MR/RGD/RNP-16/2018-20 (31-12-2021)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर ■ मुख्य संपादक : इब्राहीम अफगाण* ■ डिजिटल आवृत्ती संपादक : माधवी माणिक सावंत
(✻ या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)